# श्री साईलीला



श्री बाबा व वासुदेवानंद सरस्वती यातील बंधुभाव

# अनुक्रमणिका – एप्रिल १९७८


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | — | श्री बाबांची उदी – उदीचा महिमा |
| २) | श्री समर्थ अक्कलकोट स्वामी | — | सदानंद चेंदवणकर |
| ३) | श्री सद्गुरु कदमबाबा | — | — |
| ४) | अहो, हा उदीचा परिणाम | — | श्री. लिमयेबाबा |
| ५) | श्री साई आरती व उदी | — | डॉ. अनिल जायस्वाल |
| ६) | आमचा उदी अनुभव | — | डॉ. सौ. सुमती खानविलकर |
| ७) | सर्वात प्रभावी औषध उदी! उदी! | — | ॲडव्होकेट श्री. जी. बी. वायसे |
| ८) | उदी नो हे नुसते भस्म | — | श्री. विजय हजारे |
| ९) | उदी लावण्याची बाबांची पद्धत | — | श्री. द. शं. टिपणीस |
| १०) | साईची अगम्य शक्ती | — | श्री. पां. वा. भुलकर |
| ११) | प्रभुरामचंद्राची निर्मोहावस्था | — | श्री. अवधूत स्वामीमहाराज |
| १२) | श्री साईबाबा उदी महात्म्य | — | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| १३) | श्री. दाजीसाहेब जोशी | — | सदानंद चेंदवणकर |
| १४) | बाबांची उदी | — | सौ. लीला बनगे |
| १५) | उदी ही बस एक सहारा | — | श्री. कालिंदी प्रसाद श्रीवास्तव |
| १६) | धुनी | — | श्री. श्रीराम आठवले |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

लंपट गुळाचिये गोडी ।
सांडी न मुंगी तुटतां मुंडी ।
तैसी धा साई चरणीं दृढी ।
कृपा परवडी रक्षील तो ॥ १७१ ॥

गुरु-भक्त हे नाहीं वेगळे ।
दोघेही एकांग आगळे ।
प्रयत्नें वेगळे करितां थळें ।
अभिमान गळे कर्त्यांचा ॥१७२॥

एकावांचून एक ठेला ।
कच्चा गुरु तो कच्चाही चेला ।
परी तो पक्क्या गुरुचा केला ।
द्वैतीं अबोला तयासी ॥ १७३ ॥

गुरु राही एक्या गावीं ।
शिष्य तयाचा इतर गांवीं ।
ऐसें ज्याचें मन भावी ।
ते मानभावी उभयही ॥ १७४ ॥

मुळींच जरी नाहींत दोन ।
वेगळीक मग ती कुठून ।
एक न राहे एकावीण ।
इतुके अनन्य ते दोघे ॥ १७५ ॥

–श्रीसाईसच्चरित अध्याय २७ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

※

वर्ष ५७ वे ] एप्रिल १९७८ [ अं. १

※



: संपादक :

श्री. का. सी. पाठक,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

※

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

※



वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

※

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

## संपादकीय—

स. न. वि. वि.

# श्रीबाबांची उदी – उदीचा महिमा

श्रीसाईलीला मासिकाचा हा सत्तावन्नाव्या वर्षाचा पहिला अंक हा खास उदी अंक म्हणून आमच्या वाचकांच्या हाती देण्यास अत्यानंद वाटतो. गुढीपाडवा, रामनवमी या सणांच्या गर्दीत हा उदी अंक वाचकांना तोषवील असा विश्वास वाटतो. या उदी विषयावर हा पहिलाच अंक असून या अंकात जमा केलेले साहित्य मोठ्या कष्टाने हाती ठेवीत आहोत. विसाव्या शतकात, शास्त्रीय प्रगती झालेल्या जगात श्रीबाबांच्या उदीचे विशेष महत्व आहे हे कुणाही सुविद्य साईभक्ताला मान्य करावेच लागेल.

श्रीसाईबाबांच्या उदीचा महिमा श्रीसाईभक्तांना अपार वाटतो. उदीच्या रूपाने श्रीबाबांनी आपल्या भक्तांना फार मोठे तत्वज्ञान सांगून ठेवलेले आहे.

आत्मा नित्य आणि अविनाशी आहे आणि मानवी शरीर हे अनित्य नाशवंत (विनाशी न टिकणारे) आहे. हा आत्मा कर्माने (कर्म करून) जीर्ण झालेला (थकलेला) देह टाकून नवीन वस्त्राप्रमाणे दुसरा देह स्वीकारतो. देह अनित्य, न टिकणारा, नाशवंत असताना मानवाने तन-धनाची बढाई मारण्यात काय अर्थ आहे. आपल्या देहाचे सुख सोहाळे पुरविण्यासाठी माणसाने एखादा सुंदर भव्य प्रासाद, बंगला बांधावा आणि आपण स्वतः मात्र एखाद्या जंगलात जाऊन अखेरीस मातीत मिसळून जाऊन चिरनिद्रा घ्यावी. जीवनाचा ओघ चालू असताना, "माती असशी मातीस मिळसी" तू मूळात मातीतून (पंचमहाभूतातून) जन्म पावला आहेस आणि शेवटी मातीलाच जाऊन मिळणार आहेस आणि पंचमहाभूतात विलीन होणार आहेस ! हे साधे तत्वज्ञान माणूस नेहमी दृष्टीआड करीत असतो. बघता बघता त्याच्या डोळयात स्वार्थाची धूळमाती जाते.

'मानवी संसार हा उदीसारखा म्हणजे मृत्तिकेसमान आहे. हे तत्व भक्तांच्या सतत डोळयांसमोर राहावे याकरिताच श्रीसाईनाथ बाबांनी आजन्म उदीप्रदान केले.

बाबांच्या द्वारकामाईत धुनी सतत पेटलेली असे. अग्निनारायणाच्या सान्निध्याने आणि साक्षीने बाबांचे सारे व्यवहार चालत असत आणि त्या धुनीतून जी अमित राख (भस्म) उत्पन्न होई त्यातून भक्तांना बाबांची 'उदी' रूपी (भस्म) अंगारा मिळत असे.

श्रीसद्गुरु बाबांचे दर्शन घेऊन भक्त माघारी जाऊ लागला म्हणजे त्याला उदी (प्रसाद) देण्याचा बाबांचा परिपाठ असे. बाबांच्या हातून उदी मिळाली म्हणजे घरी परत जात असताना भक्तांना मोठे समाधान व उल्हास वाटत असे. त्या विभूतीदानात बाबांचे विशिष्ट मनोगत असे. रक्षाप्रदान करताना एका गहन तत्वज्ञानाचा आविष्कार बाबांच्या मनात स्फुरत असे. त्यांनी उदीचे एक तत्वज्ञान बनविले होते व आपल्या भक्तांनी त्या तत्वज्ञानाची सतत कास धरून वागावे अशी बाबांची मनातील सदिच्छा होती.

मानवी देह हे केवळ पंचमहाभूताचे काष्ठ आहे. अवशिष्ठ शिल्लक राहिलेले भोग भोगण्यासाठी या देहाची येथे पाठवणी झाली आहे हे भोग भोगून एकदा सरले म्हणजे ते देहरूप काष्ठ निश्शेष होऊन जाईल. भोगाभिच्या योगाने त्याची रक्षा



द्वारकामाईतील हीच ती उदी देणारी धुनीमाई

म्हणजेच भस्म बनेल. अखेर देहाची राख होणार आहे याप्रमाणे तत्वज्ञान सांगून झाल्यावर बाबा भक्तांना सांगत—

तुमची आणि माझी अखेरची हीच अवस्था होणार आहे. या स्थितीची रात्रंदिवस स्मृती रहावी या हेतूने मी ही विभूती—'उदी' तुम्हा भक्तांना देत असतो.

हे अखिल विश्व मायेने वेष्टिलेले आहे. ब्रह्म सत्य असून ब्रह्मांड मात्र असत्य आहे. याची 'उदी' ही 'खूण' आहे!

या जगात कोणी कोणाचे नाही! बायको, पुत्र, माता, पिता, चुलते, मामे, भाचे इत्यादि हा सारा मायेचा खेळ आहे.

आपण या जगात नग्नावस्थेत आलो. त्याच अवस्थेत आपण शेवटी परत जाणार आहोत. या गोष्टीचे 'उदी' हे खरोखर 'स्मारक' आहे! या उदीचे चर्चन केल्यानंतर उदी लावल्यानंतर अधिव्याधींचे निरसन होते ही गोष्ट खरी आहे! परंतु या उदीचा तात्त्विक अर्थ मोठा गहन आहे! विवेकपूर्ण वैराग्याशिवाय हा भवसागर तरून जाता येणार नाही.

देववेल तितकी दक्षिणा देऊन हाती वैराग्य येईल ही गोष्ट खरी मानली तरी त्या वैराग्याच्या जोडीला जर विवेक नसेल तर त्या वैराग्याची माती होईल, म्हणून उदी त्या मातीचे प्रतीक माना व त्या विभूतीचा आदर ठेवा. त्यायोगाने 'विवेक' आणि 'वैराग्याची' सांगड जुळून हा भवसागर तरून जाता येईल. सारांश,

हा मानवी संसारच उदीसमान आहे.

मानवी देह नश्वर असून कमळपत्राप्रमाणे आहे.

देह हा आज ना उद्या पतन पावणार आहे. 'सकल विश्वाचा हा पसारा राखरांगोळी समान आहे.' 'उदी' हे या गोष्टीचे प्रतीक आहे. 'उदी' म्हणजे केवळ माती असून नामरूपाची अंतिम गति तिने दिग्दर्शित केली आहे.

बाबांच्या मशिदीत रात्रंदिवस अक्षयी प्रदीप्त असलेल्या या उदीच्या किती गोणी बाहेर पडल्या असतील त्याची गणना करण्यास कोणीही समर्थ नाही. आपले शरीर नाशवंत आहे, त्याचा मोह ठेवणे अयोग्य आहे, हे तत्त्व उदीने दाखवून दिले.

बाबा आपल्या स्वतःच्या हाताने प्रेमळ भक्ताच्या डोक्याला भस्म (उदी-विभूति) फासीत आणि मुक्तहस्ताने उदी भंडार लुटण्याची परवानगी देत त्याप्रसंगी भक्तांच्या अंतःकरणात आनंदाच्या लाटा उसळत. स्वतः बाबादेखील अशा प्रसंगी स्वर्गीय आनंदात रममाण झालेले दिसत. आनंदाने त्यांचे हृदय इतके भरून येई की, प्रेमानंदाने ते आपल्या खड्या गोड सुरेल आवाजात गाऊ लागत :—

रमते राम आयोजी आयोजी ।
उदियोंकी गोनिया लावोजी ॥

बाबांच्या या परमकल्याणी उदीच्या पोटी अनेक चमत्कार जन्म पावले आहेत.

(१) कोणत्याही दंशाच्या जागी बाबांची उदी फार उपयोगी पडलेली आहे. (२) नारूची व्यथा या उदीने बरी केली. (३) प्लेगाच्या गाठी बऱ्या केल्या. (४) तान्ह्या मुलांची आकडी बरी केली. (५) मुनखडयाची व्यथा दूर केली. (६) अनेक गर्भिणींच्या प्रसूती सुलभ केल्या आणि (७) भूतपिशाच्चांना दूर पळवून लाविले इत्यादि. बाबांच्या उदीने असे अनेक चमत्कार केले आहेत. स्वतः बाबांना मात्र या धुनीच्या आणि उदीच्या रूपाने भक्तांना आत्म्याचे नित्यत्व आणि देहाचे क्षणभंगुरत्व विशद करून सांगावयाचे होते.

देहस्थ वाटणारा आत्मा वस्तुतः देहस्थ नसतो. कारण आत्मा नित्य (अमर) आहे तर देह अनित्य (नाशवंत) आहे.

शुद्ध चैतन्यस्वरूप आत्मा कधी वाढतहि नाही किंवा घडतहि नाही. परंतु मानवी–मनुष्याच्या देहाची–शरीराची स्थिती मात्र निराळी असते.

देह–शरीर मी, हे माझे धन, असा शब्दोच्चार सुरू झाला म्हणजे 'देहाभिमान' जागृत झाला असे समजावे. याच गोष्टी हृदयाला बांधून टाकतात आणि मायेचा खेळ त्या ठिकाणी सुरू होतो.

अशा स्थितीत देह जरी निमाला तरी कर्मबीजामुळे त्याला देहांतर (दुसरा जन्म) प्राप्त होते.

हे मीपणाचे बीज जोपर्यंत अजिबात (निःशेष) जळत नाही तोपर्यंत पुनर्जन्माची अधिवेशने (फेरे) सुरूच असतात. त्या बीजरूपी मीपणाच्या भावनेने पुन्हा वृक्ष बनतात आणि त्या वृक्षाचे पुनरपि (पुन्हा) बीज होते. जोपर्यंत वासना निमत जात नाही तोपर्यंत हे जनन–मरणाचे चक्र अव्याहतपणे सुरू असते. वासनांचा एकदा परित्याग झाला (वासना सुटली) म्हणजे ब्रह्मानंदाचा योग प्राप्त होतो. परब्रह्म आणि हेच मानवाचे मनोप्सित (ध्येय) असते. वासनांचे निर्मूलन झाले म्हणजे चित्तशुद्धि होऊन आत्म्याचे खरे स्वरूप माणसाला कळू शकते. आम्हा अन्य जनांना आमच्या जन्माचे मूळ कारण समजत नाही. आम्ही कोठून आलो, कोठे जाणार आहोत, आम्ही कशासाठी निर्माण झालो आणि आमच्या जन्माचे प्रयोजन काय या गोष्टी आम्हास ठाऊक नसतात अशा स्वच्छंदी अवस्थेत आम्ही आमचा जन्म कंठतो. पुढे मृत्यू जवळ आल्यानंतर सकल इंद्रियगण विकल होऊन जातो, तरीही माणसाला सुविचार केव्हाच सूचत नाही.

आपली पत्नी, आपला पुत्र, आपली माता, आपला पिता, बंधु, इष्टमित्र ही

सारी मंडळी आपल्याला सोडून आपल्या देखत निघून गेली तरीहि माणसाच्या मना विचारांचा उद्‌भव होत नाही.

आपल्या भक्तांना हे विचार सांगण्यासाठी बाबांनी आपला देह प्रत्य ठेवण्याच्या आधीच स्वहस्ते आपली समाधि बांधून ठेविली होती! एखाद्या अग्नि-होत्राप्रमाणे बाबांनी आपले पवित्र अग्निहोत्र रात्रंदिवस प्रज्वलीत ठेवले होते. त्य धुनीपासून निघणाऱ्या उदीचा महिमा अपार होता!

स्मशानवासी शंकरांनीहि भस्माचे भूषण याच प्रमाणे मानले होते. आपल्य विशाल कपाळावर मोठ्या भक्तिभावाने याच उदीचे चर्चन ते विश्वंभर श्रीशंक भगवान करीत असत. त्या योगाने साऱ्या विघ्नांचे तात्काल निरसन होऊन जाई. तोंड धुवून आणि स्नान करून जो नित्य 'उदी' विलेपन करतो, त्याचे चरण तीर्थ-प्रमाणे पावन होतात.. तो पूर्णायुष्यवाला होतो. त्याची सारी पातके जळून उदी प्रमाणे भस्म होऊन जातात, आणि त्याला सर्वदा सुखसंतोष या गोष्टी प्राप्त होतात. मात्र भक्तांच्या ठिकाणी पूर्ण भक्तिभाव हवा हे लक्षात ठेवावे. बाबांच्या धुनीने अनेक भक्तांच्या देहविषयक भावना जाळल्या आणि त्यांच्या उदीने अनेकांच्या देहव्याधी बऱ्या केल्या. बाबांनी पेटविलेली 'धुनी' अद्यापपर्यंत त्यांच्या द्वारका-माईत प्रज्वलित अशा अवस्थेत जागृत आहे. जोपर्यंत बाबांची ही 'धुनी' पेटलेली आहे तोपर्यंत त्या धुनीचा प्रकाश जगताला अध्यात्मिक मार्गदर्शन करीत राहील. आणि तिच्यापासून निघणाऱ्या उदीने अनेक अपंग, आपद्‌ग्रस्त लोकांची विमुक्तता होईल! एखाद्या जागृत दैवताप्रमाणे ते स्थान अद्यापहि त्या ठिकाणी उभे आहे. बाबांच्या दर्शनास येणाऱ्या मंडळीमध्ये सकाम (इच्छा धरून) येणाऱ्या भक्तांचेच प्रमाण अधिक असे. कोणत्या तरी कारणाने त्रस्त अगर पीडित झाल्यामुळे द्रव्याच्या हेतुने, लग्न व्हावे म्हणून, पुत्र प्राप्ति व्हावी, मनःशांति लाभावी इत्यादि अनेक हेतूने शिरडीला बाबांच्या दर्शनासाठी येत असत. कृपासागर बाबा त्या सर्वांचे मनोरथ पूर्ण करीत व त्यांना भक्तिमार्गास लावीत. दक्षिणेच्या रुपाने गोळा झालेले सर्व रुपये बाबा धर्मादाय कामाकडे खर्च करीत व काही गरजू गरीब भक्तांना वाटून टाकीत. बाबांनी श्रीमुखाने असे उद्‌गार काढले आहेत की, 'मला भक्तांकडून जे मिळते त्याच्या हजारो पटीने ते परत करावे लागतात'! कित्येक प्रसंगी बाबांनी दक्षिणा परत देऊन ते पैसे नीट जतन करून ठेवण्यास आणि काही भक्तांना तर ते पैसे देव्हाऱ्यात ठेवून त्यांची पूजा करण्यास सांगितले आहे. बाबांच्या हातून प्रसाद म्हणून मिळालेल्या रुपयांची पूजा केल्याने पुष्कळांचे भाग्य उदयास येऊन त्यांचे कल्याण झाले आहे! एकाच वेळी दोन ठिकाणी दर्शन देण्याचे प्रकार घडविण्यात

अतींद्रिय शक्ति बाबांच्या ठिकाणी होती. श्रीसाईबाबा जागृतावस्थेत व स्वप्नात निरनिराळे देह धारण करून भक्तांना दर्शन देत.

बाबांच्या लीला अत्यंत चमत्कारिक आणि मनाला गुंग करून सोडणाऱ्या आहेत.

## उदीच्या प्रभावाचे प्रत्यक्ष अनुभव

द्वारकामाईत सतत जवळ ठेविलेल्या धुनीतील ' उदी ' रुपी विभूतीसंबंधाने हजारो लोकांना विलक्षण अनुभव आले आहेत :—

एका पारशी गृहस्थाच्या तान्ह्या मुलीला आकडी ( फीट ) येण्याची सवय जडली. प्रत्येक तासातासाने अंगात वारे आल्याप्रमाणे ती मुलगी हातपाय वाकडे करून अत्यवस्थ होई. त्या गृहस्थाने बाबांच्या उदीचा प्रयोग करून पाहिला आणि हळूहळू त्या मुलीला उतारा पडत गेला! बाबांनी आपल्या हातांनी दिलेल्या उदीचा प्रभाव जितका गुणकारी असे तितकेच त्यांच्या श्रद्धाळू भक्तांनी बाबांच्या नावाने दिलेले भस्मदेखील अचूक परिणामकारक ठरत असे.

नानासाहेब चांदोरकर आपल्या पत्नीसह एकदा कल्याणला जात असताना ठाणे स्टेशनावर त्यांचा वांद्र्यास राहणारा मित्र धाईधाईने भेटला आणि आपल्या मुलीला प्लेग झाला आहे असे सांगू लागला. नानासाहेबांजवळ त्या वेळेस बाबांची उदी नव्हती. तेव्हा बाबांचे भक्तिपूर्ण श्रद्धेने नामस्मरण करून पायाखालची थोडी माती चिमटीत घेऊन नानासाहेबांनी ती आपल्या मित्राला देऊन साईचरणी लीन होण्याची विनंती केली. त्या मित्राने आपल्या मुलीच्या घरी जाऊन तिला उदी लावताच त्या क्षणापासून त्या मुलीचा ताप उतरू लागला आणि प्लेगसारख्या असाध्य रोगातूनदेखील ती मुलगी बाबांच्या कृपेने बरी झाली. बाबांच्या नुसत्या नामस्मरणाने उचललेल्या मातीने किती अजब चमत्कार करून दाखविला! नानासाहेब चांदोरकरांनी बाबांचे नाव श्रद्धेने घेऊन माती अंगारा म्हणून देण्याचे धारिष्ट्य केले याचे कारण बाबांवर त्यांचा पूर्ण विश्वास आणि श्रद्धा होती.

श्री बाबांच्या चिमुटभर उदीवरही भक्तांचा तोच विश्वास आजही कायम आहे.

卐

# श्री समर्थ सद्गुरु अक्कलकोट स्वामी महाराजांचे निर्वाण शतक

* सदानंद चेंदवणकर
चेंबूर, मुंबई ८९



● श्रीसमर्थ सद्गुरु भगवान श्रीअक्कलकोट स्वामी महाराज यांच्या महानिर्वाणाला यंदाच्या या एप्रिलच्या ३० तारखेस शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांचा हा निर्वाण शतक महोत्सव भारतात जिथे जिथे म्हणून दत्तमंदिरे आहेत तिथे तिथे मोठ्या प्रमाणावर साजरा होईलच यात शंका नाही. हा महोत्सव राष्ट्रीय पातळीवर साजरा व्हावा यासाठी यत्न चालू आहेत.

श्रीदत्त सांप्रदायिकांचे परम पवित्र स्थान अक्कलकोट हे आहे. गाणगापूरच्या अगदी जवळच मुख्य रेल्वेमार्गावर हे स्थानक आहे. पूर्वी अक्कलकोट हे मुंबई

प्रांतातील एक संस्थान होते. पण संस्थानांचे विलीनीकरण झाल्यामुळे महाराष्ट्र राज्यात आता ते सामील करण्यात आलेले आहे.

या अक्कलकोटच्या आध्यात्मक क्षितिजावर इ. सन १८५७ च्या सुमारास विश्वाचा आभास मावळून टाकण्यासाठी श्रीस्वामी समर्थरुपी अक्कलकोट स्वामी प्रगटले, उदयाला आले. केवळ अक्कलकोटचेच नव्हे तर अखिल भारताचे कोटकल्याण या अवतारी महापुरुषामुळे झाले आहे. श्रीदत्तात्रेयाचे भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती हे अवतार आहेत आणि मोठ्या आश्चर्याची गोष्ट श्रीनृसिंह सरस्वतींचाच अवतार किंवा साक्षात् श्रीनृसिंह सरस्वती म्हणजेच पूर्णब्रम्ह भगवान श्रीस्वामी समर्थ अक्कलकोट हे होत. यासंबंधाची कथा आहे ती अशी—

काठेवाडच्या पवित्र भूमीवर सुप्रसिद्ध गिरनार पर्वताच्या उंचच उंच शिखरावर श्रीदत्तावतार श्रीमत् जगद्‌गुरु श्रीस्वामीमहाराज श्रीदत्त भगवानांच्या स्वरुपात प्रगट झाले. त्यांचे संपूर्ण नाव श्रीपाद श्रीवल्लभ, महाराष्ट्रातील अक्कलकोट संस्थानात सुमारे २२ वर्षे वास्तव्य करून त्यांनी आपल्या सामर्थ्याने अनेक लीला करून दाखविल्या. नृसिंहसरस्वती असेही त्यांस म्हणतात. अक्कलकोटी प्रगट होण्याच्यापूर्वी श्रीस्वामी समर्थ मंगळवेढे येथे शके १७६० चे सुमारास प्रसिद्धीस आले. तिथे ते कोठून आले याबद्दल निश्चितपणे काहीच सांगता येत नाही. तथापि त्यांचे भक्तजन असे सांगतात की—

उत्तर भारतीय अमर सरिता गंगा हिच्या उत्तर किनाऱ्यावर एक सुंदर तपोवन आहे. त्यास कर्दळीवन असे म्हणतात. त्या अरण्यातील एका वृक्षाच्या छायेत ते ध्यानस्थ झाले. या अवस्थेत कित्येक दिवस, सप्ताह, महिने नि वर्षे गेली व त्यांचा पुण्य देह मातीच्या ढिगाऱ्याखाली संपूर्ण झाकला गेला. त्यांच्या शरीरासभोवती एक अंगी वारूळ तयार झाले. याच अरण्यात एक लाकुडतोड्या लाकडे तोडण्याकरता आला. त्याने मातीच्या ढिगाऱ्याखाली बुंधा लपलेल्या त्या झाडावर आपली कुऱ्हाड चालविली पण आश्चर्य असे की आपल्या कुऱ्हाडीच्या घावासरशी लाकूड तुटण्याऐवजी रक्तधारा वाहू लागल्याचे दिसताच तो लाकूडतोड्या भयभीत होऊन गेला. काय करावे हे त्याचे त्याला सुचेना ! त्याने तत्क्षणीच कुऱ्हाड फेकून दिली व वृक्षासभोवतालची माती दूर केली. तो काय नवल ! परमतेजस्वी स्वामींच्या दिव्य दर्शनाचे पुण्यफल त्यास प्राप्त झाले. त्याने लगोलग जंगली वनस्पती आणून स्वामीजींच्या जखमेवर मलमपट्टी केली. त्यायोगे रक्तप्रवाह बंद झाला. हा इतका प्रकार झाला तरी स्वामीजी आपले समाधि अवस्थेतच मग्न होते. जेव्हा ते जागे

झाले तेव्हा लाकुडतोड्याने अपराधाची क्षमा मागितली. स्वामींनी त्याला चांगला आशिर्वाद दिला.

समाधिस्थ स्वामी जागृत झाल्यावर त्यांनी काशी, प्रयाग इ. क्षेत्री यात्रा सुरु केली. त्यानंतर ते अक्कलकोट येथे येऊन राहिले. त्यावेळी त्यांचे वय चारशे ते पाचशे वर्षाचे असावे. त्यांचे तितके वय होते याला अनेक आधार आहेत.

गिरनार पर्वतावर श्रीसेवादास नामक एका योगी पुरुषाने वामनबुवा ब्रह्मचारी यांना शके १७९५ चे सुमारास असे सांगितले की त्यांनी श्रीस्वामी समर्थांना गिरनार पर्वतावर केवळ पाहिले नसून त्यांचेकडून योगाभ्यासाविषयींच्या कित्येक शंकांचे निरसन करून घेतले आहे. आमचा जन्म साडे चारशे वर्षांपूर्वी झाला आहे. असेही एकदा श्रीस्वामीसमर्थांनी आपल्या शिष्यगणाना, भक्तांना सांगितले होते.

इ. सन १८३८ च्या सुमारास श्रीस्वामी प्रथम मंगळवेढा येथे प्रकट झाले. तिथे ते कमीतकमी बारा वर्षे तरी होते. तेथील पटवर्धन इनामदार यांच्या कुरणात ते नित्य राहात. इ. सन १८५० मध्ये त्यांनी मंगळवेढे सोडले व ते पंढरपूर मार्गे मोहोळास आले. वाटेत त्यांना भीमा नदी लागली. तिला तेव्हा महापूर आला होता. पाण्यातून जाण्यासाठी नावा होत्या पण समर्थांना काय त्याचे ? त्यांनी पायीच नदी ओलांडण्यास सुरुवात केली व काय चमत्कार ! त्यांना केवळ गुडघाभरच काय ते पाणी लागले ! मोहोळ येथे पाच वर्षाच्या वास्तव्यानंतर ते सोलापूरास येऊन राहिले. तिथे ते श्री. रामभाऊ गुर्जर यांचे घरी राहात असत.

पुढे १८५७ साली ते अक्कलकोट येथे आले. तेव्हा हिंदु धर्म अस्ताचलास चालला होता. तिथे अनेक तपस्वी स्वामीजींच्या दर्शनास आत येत असत. अक्कलकोटचे तत्कालीन संस्थानिक तर स्वामींच्या पादुकांचे यथोचित पूजन करून ब्राम्हण भोजन घालीत असत. स्वामींनी २३ वर्षाच्या वास्तव्यात अनेक चमत्कार करून जनतेची दुःखे दूर केलेली आहेत. त्यांनी आपल्या भक्तगणांना दत्तरूप दर्शन देऊन सत्यधर्माचा प्रसार प्रचार केला.

अक्कलकोटला येण्यापूर्वी स्वामी मंगळवेढे येथे राहात होते. एकदा ते भिक्षा मागत मागत एका ब्राम्हणाच्या घरी आले व दुधाची भिक्षा मागू लागले. ब्राम्हणाकडे गाय होती परंतु ती दुभती नव्हती. तेव्हा ब्राम्हण मोठ्या दुःखाने म्हणाला, "अतिथी महाराज, घरात गाय आहे पण ती दुध देत नाही." तेव्हा स्वामीजी गायीपाशी गेले व म्हणाले, गोमाते, या दीन ब्राम्हणावर दया कर ! संध्याकाळी मी दूध प्राशन करण्यास येईन" असे ब्राम्हणास सांगून स्वामीजी अंतर्धान पावले.

ब्राम्हणाने सायंकाळी धार काढण्याचा यत्न केला. तो काय आश्चर्य ! भरपूर दूध त्याला मिळाले.

अशाच प्रकारची एका तेल्याची कहाणी आहे. या तेल्याचे नाव होते बसाप्पा. बसाप्पा जंगलात भटकत असताना स्वामी काटेरी आसनावर बसलेले त्याला दिसले. ते दृश्य बघून त्याला दुःख झाले. त्याने त्यांना चांगल्या ठिकाणी आसनावर आणून बसविले. हाच बसाप्पा पुढे स्वामीजींचा निस्सीम भक्त झाला. रात्रं-दिवस कामधंदा सोडून स्वामीजींच्या बरोबर तो गावागावातून नि वनावनातून हिंडत फिरत असे. एकदा छानदार अरण्यातून स्वामी व बसाप्पा चालले होते. स्वामींना काय वाटले कुणास ठाऊक त्यांनी आपल्या सामर्थ्याने सभोवताली सर्पच सर्प निर्माण केले. ते शेकडो सर्प बघून बसाप्पा घाबरला. त्यावर स्वामी म्हणाले, 'जेवढी आवश्यकता आहे तेवढे घे !' स्वामींच्या आज्ञेस अनुसरून मोठ्या धीराने त्याने एक छोटासा सर्प आपल्या झोळीत टाकला. घरी परतल्यावर निर्धन बसाप्पाने झोळीत पाहिले तो काय नवल ! सर्पाच्या आकारा एवढीच सोन्याची लगड होती !

अक्कलकोट येथे तर महाराजांच्या दर्शनास हिंदू, मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन या प्रमाणेच मोठमोठे इंग्रजही येत. पाखंडी व ढोंगी लोकांचा महाराज धिक्कार करीत. ते सर्वांना, आपले कर्तव्यकर्म करा, उद्योगी बना, परिश्रम करा; व त्याबरोबरच परमेश्वराचे नामस्मरण करा, असा सदुपदेश करीत. एकदा धोंडीबा नामक एक भक्त त्यांचे पुढे नतमस्तक होऊन म्हणाला, "महाराज, कार्तिक स्वामी नाहीत काय ?" धोंडीबाने मान वरती करून पाहिले तो काय ? त्याला तिथेच कार्तिक स्वामींचे दर्शन झाले ! !

अक्कलकोट येथे प्राणदानाची एक कथा सर्वत्र प्रचलित आहे. एक वृद्धा आपल्या मृत पुत्रास चादरीखाली झाकून घेऊन मोठ्या शोकावेगाने महाराजांकडे आली. तिची ही अवस्था जाणून समर्थ म्हणाले, "मुलाला माझ्याकडे आणा !" वृद्ध मातेने मुलाला स्वामीजींच्या जवळ नेले, तो काय अद्भुत चमत्कार ! स्वामींनी मुलाला हालविले नि मुलगा जिवंत होऊन ताडकन् उभा राहिला ! ! आपण अगदी गाढ झोपेत होतो असे मुलाने सांगितले.

इंदूर नरेश तुकोजीराव होळकर स्वामीजींचे परमभक्त होते. आपल्या दोन्ही पुत्रांसह ते स्वामीजींच्या दर्शनास अक्कलकोट येथे आले. तेव्हा महाराज म्हणाले, पूर्व जन्मीची पुण्याई म्हणूनच की काय अबू पर्वतावरील दर्शनानंतर हा दर्शनाचा योग आला. जेव्हा नरेश परत गेले तेव्हा भक्तगणात चर्चा सुरु झाली की समर्थ अबू पहाडावर केव्हा गेले होते ? शोध करता करता असे समजले की अबू पर्वतावर

श्रीदत्तभगवंतांच्या पादुका असून तिथे एक वृद्ध तपस्वी तपस्या करीत आहे. हे तपस्वी म्हणजे दुसरे तिसरे कुणी नसून स्वतः समर्थमहाराज होते. श्रीसमर्थांनी बडोद्यास भेट द्यावी अशी बडोद्याचे महाराज मल्हारराव गायकवाड यांची खूप इच्छा होती. स्वामीमहाराजांना जो बडोद्यास घेऊन येईल त्यास मोठे पारितोषिक देण्यात येईल असे त्यांनी जाहिर केले. लालसेने तात्यासाहेब नामक एक व्यक्ति अक्कलकोटला आली व स्वामीजींच्या कानावर नाव जावे या उद्देशाने तिथे खूप दानधर्म करू लागले. त्याने नंतर स्वामीजींचे एक शिष्य चोळाप्पा यास फूस लावली व स्वामींना बडोद्यास घेऊन चलशील तर तुला जहागिरी मिळेल असे सांगितले. चोळाप्पाने वेळ प्रसंग बघून स्वामींना म्हटले, "महाराज आपण जर बडोद्यास चलाल तर मी जहागिरदार होईन. मल्हारीस आपल्या दर्शनाची खूप इच्छा आहे." त्यावर स्वामी म्हणाले, "अरे, मल्हारीस इच्छा असेल परंतु भक्ती त्याचेकडे थोडीच आहे!" त्या उत्तराने महाराज कधीच बडोद्यास जाणार नाहीत हे चोळाप्पा समजला व तात्यास अयशस्वी होऊन बडोद्यास परतावे लागले. शेवटी त्याने यशवंतराव नामक एका हकीमास अक्कलकोटला बरेचसे जडजवाहीर व वस्त्राभूषणे देऊन पाठविले. महाराजांचे चरणी ती भेट अर्पण करून तो म्हणाला, "महाराज आपण बडोद्यास चलावे." स्वामींनी उत्तर दिले, "जिथे भक्ति नाही तिथे मी नाही." व दिलेली भेट परत केली पण यशवंतराव काही आपला हेका सोडीना तो सारखा स्वामींना विनंत्या करीत असे. शेवटी स्वामींनी त्यास रागाने सांगितले, "हातात बेड्या पडून तुला आता तुरुंगात जावे लागेल!" या वाक्याचा काहीच अर्थबोध न होऊन शेवटी निराशेने तो बडोद्यास परत चालला. परंतु वाटेत मद्रास पोलीसांनी त्याला अटक केली व मल्हारराव, तात्यासाहेब व यशवंतराव यांचेवर खुनाच्या आरोपावरून त्यांना पकडून त्यांच्यावर खटला भरला. ही घटना दत्तावतार स्वामींनी अनेक अंतर्ज्ञानाने कथन केली होती.

सुवासिक पुष्पातील गंधासमान अशी पुण्यकिर्ती दिगंतात पसरली. धर्मोद्धाराकरिता त्यांनी आर्यावर्तात पर्यटण केले आणि पाखंड्याना योग्य तो धडा शिकविला. आपल्या कार्याची रूपरेखा आपल्या भक्तगणांना दाखवून दिल्यावर समाधिस्थ होण्याच्या इच्छेने त्यांनी समाधिची तयारी चालविली. त्यांचे शिष्य चोळाप्पा यांनी त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानली. स्वामी समाधी घेत आहेत हे ऐकताच चोहोकडून अफाट जनसमुदाय अक्कलकोटला स्वामींच्या दर्शनार्थ येऊ लागला. डोळ्यात अश्रू व हृदयात अपार श्रद्धा व अविचल भक्ति घेऊन वृद्ध काय युवक नि बालकेसुद्धा भगवानांच्या दर्शनार्थ येऊ लागली. अखेरीस स्वामींनी

"अनन्याश्चिन्त यन्तो माम् ये जनाः पर्युपासते
तेषां नित्याभि युक्तांनां योगक्षेमं वहाम्यहम् "

अशा दिव्य संदेश लिहिला व त्यांच्या स्थूल शरीराचे नयन कायमचे बंद झाले. ही घटना शक संवत् १८०० म्हणजे इ. स. १८७८ च्या चैत्राच्या वद्य त्रयोदशीस मंगळवारी दुपारी चार वाजता घडली आणि श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती दत्तावतार श्रीस्वामी समर्थ यांच्या अवताराची, कार्याची समाप्ति झाली.

आज या घटनेला शंभर वर्षे होत आहेत आणि म्हणूनच स्वामीजींच्या या शतकमहोत्सवी निर्वाण पुण्यतिथीला सर्वदत्त, सर्व साईभक्त स्वामीजींना प्रणाम करीत आहेत. 卐

# नांदा सौख्यभरे

सुप्रसिद्ध साईभक्त, मराठीतील सुविद्य लेखिका, जयहिंद कॉलेजातील मराठी विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. सौ. चारुशिला गुप्ते यांचे चिरंजीव श्री प्रणयकुमार एम. एस. (जर्नालिझम) न्यूयॉर्क टाईम्स यांचा विवाह सिकंदराबादचे श्री. आनंद लाल यांची सुविद्य कन्या जयंती हिज बरोबर शुक्रवार दि. २ मार्च रोजी सिकंदराबाद येथे साजरा झाला. विवाह समारंभानिमित्त भोजन समारंभ शनि. ता. ४ मार्च ७८ रोजी वॉर्डन रोडवरील पामब्रिच हायस्कूल गार्डन येथे आयोजित करण्यात आला होता तर स्वागत समारंभ रवि. ता. ५ मार्च रोजी सायंकाळी ताजमहाल हॉटेल मधील बॉलरुम मधे आयोजित करण्यात आला होता. या दोन्ही प्रसंगी विविध क्षेत्रातली मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने वधूवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी हजर होती. चि. प्रणय इतका साईभक्त आहे की त्यास कुणी खावयास काही जरी दिले, तरी तो प्रथम बाबांच्या पुढ्यात ठेवतो, अमेरिकेत अगदी चॉकलेट सुद्धा प्रथम बाबांना देतो व मगच तो खातो. सौ. जयंती या उत्तम नर्तिका आहेत.

श्री कदम बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त खास लेख

# श्री परम साईभक्त सद्गुरु कदमबाबा

श्रीदत्त भक्त व श्रीसाई भक्त दया, क्षमा, शांती यांचे जनक म्हणून कदमबाबा सर्वांना परिचयाचे आहेत. कदम बाबा यांचा जन्म नोव्हेंबर १९०७ मध्ये दापोली तालुक्यातील करंजाणी गावात एका गरीब कुटुंबात झाला. बाबांचा जन्म देखील एक शुभदिनी म्हणजे कार्तिक शुद्ध एकादशीस झाला. कदमबाबांचे वडील चंद्रोबा खंडोजी-राव कदम हे एक गरीब शेतकरी होते व लहानशा तुकड्यावर उपजीविका करीत. घरात अठराविश्वे दारिद्य परंतु घरामध्ये पूर्वापार भक्ति चाललेली. श्री चंद्रोबा त्यांना त्यांचे पूज्य दैवत खंडोबाराया यांचा संपूर्ण आशीर्वाद होता व ते त्यांची नित्यनेमाने पूजाअर्चा करीत ज्या ज्या वेळी त्यांन अडचण पडे त्या त्या वेळी ते खंडेरायाचे स्मरण करीत व त्यांची अडचण दूर होई. ज्या वेळी श्री चंद्रोबावर संकट यायचे याची पूर्व सूचना त्यांना देवतेकडून मिळे. थोड-



क्यात कुलदैवत खंडेरायाची पूर्ण कृपादृष्टि ह्या कुटुंबावर होती. अशा या गरीब परंतु सात्विक व धर्मशील कुटुंबात कदमबाबा यांचा जन्म झाला. साहजिकच लहाणपणापासून त्यांच्या मनावर चांगले व धार्मिक संस्कार घडले. पुढील कार्याची पायाभरणी त्यांच्या आईवडीलांच्या छायेखाली झाली. श्रीकदमबाबा यांना एकच भाऊ होता व तो त्यांच्यापेक्षा १२ वर्षांनी मोठा होता.

त्यावेळी करंजाणी गावात शाळा नव्हती. साहजिकच कदमबाबा यांना शिक्षणाचा लाभ झाला नाही. आपल्या आईवडीलांना घरकामात मदत करणे, शेतीवर जाणे इत्यादी कामे त्यांना करावी लागत. परंतु त्यांचा ओढा आध्यात्मिक मार्गाकडेच होता. फावल्या वेळी देवळात जाणे देवाची गाणी गाणे यांचा त्यांना छंद लागला. घरच्या गरीब परिस्थितीमुळे त्यांना पोटापाण्याची सोय पाहणे जरुरीचे होते. लहानशा तुकड्यावर सर्व कुटुंबाचे पोषण होणे कठीण होते. त्यावेळी बरीच माणसे नोकरीसाठी मुंबईला जात. म्हणून बाबांनी मुंबईस जाण्याचे ठरविले. पहिल्याने त्यांचे आईवडील

त्यांना एवढ्या लहान वयात मुंबईस पाठविण्यास तयार नव्हते. परंतु शेवटी त्यांनी सम्मति दिली. श्रीकदमबाबा १९२३ मध्ये म्हणजे वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी मुंबईस आले व आपल्या नातेवाईकांकडे राहिले. थोडे दिवस बुक बाईडींगचे काम शिकले व नंतर ब्रिटीश इंडीया प्रेसमध्ये नोकरीस राहिले. सुरवातीला त्यांना पगार फक्त रु. १६ मिळत. त्यापैकी रु. ५ खाणावळ व रु. १ किरकोळ खर्च मिळून रु. ६ फक्त स्वतः साठी ठेवून बाकीचे रु. १० ते आपल्या वडीलांना पाठवत असत.

मुंबईत आल्यानंतर बाबांना एकच छंद लागला. तो म्हणजे निरनिराळ्या देवळांना भेट देणे. अनेक साधुसंत महात्म्यांची भेट घेणे अनेक वर्षे त्यांचा हा कार्यक्रम चालू होता. परंतु त्यांचे समाधान होत नव्हते. त्यामुळे ते निराश मात्र झाले नाहीत. तर त्यांचा निर्धार वाढतच गेला. त्याचबरोबर त्यांची साधना, देवभक्ती वाढत होती. ते देवळात जाल लांबून दर्शन घेत. मुलेश्वर, माधवबाग, बाबुलनाथ वाळकेश्वर, बाणगंगा, महालक्ष्मी अशा अनेक देवळांना ते वारंवार भेटी देत. कोठे किर्तन ऐकत लहानपणी झालेले सुसंस्कार, कुलदैवताची कृपादृष्टी व त्यांनी केलेले अविरत प्रयत्न यांना शेवटी यश लाभले. एके दिवशी फणसवाडीतून जात असताना त्यांना एक दाढीवाला म्हातारा दिसला त्याला पाहताच बाबांनी त्यांच्या पायाला मिठी मारली. त्या व्यक्तीने बाबांना पोटाशी धरले. ही व्यक्ती म्हणजे कुलाबा तालुक्यातील परमपूज्य जंगम महाराज. त्यांनी बाबांना गुरूमंत्र देवून दीन दुबळ्यांची सेवा करण्यास सांगितले. त्या प्रसंगाने बाबांचे हृदय भरून आले. ज्या गुरुच्या शोधात ते इतके दिवस हिंडत होते तेच गुरू त्यांना लाभले. त्यांची इच्छा पूर्ण झाली. तेव्हा पासून बाबांनी आपले जनसेवेचे कार्य चालू केले ते जीवनाच्या अखेरीपर्यंत, त्या सेवेत त्यांनी केव्हाही खंड पडू दिला नाही.

एके दिवशी कदमबाबा आपल्या मित्रासमवेत कुर्ला येथील रामज्योतिष कार्यालयात गेले असताना ज्योतिषाने त्यांना पाहताच विचारले की, तुम्ही सर्वांचे ज्योतिष जाणता, मग इकडे कशाला आला ? बाबांच्या मित्राने ही गोष्ट जगजाहिर केली व तेव्हापासून आपले भविष्य जाणून घेण्यासाठी लोक त्यांचेकडे गर्दी करु लागले. कित्येक वेळा कटु भविष्य सांगण्याचा प्रसंग यायचे अशा वेळी आपल्या इष्टदेवतेचे ( श्रीदत्तगुरूंचे ) नाव घेऊन बाबा अंगारा देत व आश्चर्य म्हणजे लोकांना त्यात गुण येत असे. सहाजिकच लोकांची बाबांवर श्रद्धा बसली व त्यांच्याकडे लोक येऊ लागले.

बाबांची प्रेसमधील नोकरी चालूच होती. अल्पशा पगारात ते आपल्या कुटुंबाची गुजराण करीत. इतर वेळेला जनसेवेचे कार्य करीत. कोणाला अंगारा दे, कोणाचे रोग

चरे कर, असे कार्य करीत असत. त्याच बरोबर एकादा सत्पुरुष मुंबईत आला आहे असे समजले तर बाबा त्यांची भेट घेत. असेच एकदा गायवाडीत नाशिक जिल्ह्यातील भोयगांव येथील कचरनाथ नावाचे सिद्धपुरुष आले आहेत हे समजताच ते आपल्या पत्नीला व मुलाला घेऊन त्यांच्या भेटीस गेले. ती वेळ दुपारची होती. कचरनाथबाबा वामकुक्षी करत होते व दरवाजा बंद होता. जवळ जवळ दोन तास बाबांना दरवाज्याजवळ तिष्टत रहावे लागले.

ज्यावेळी कचरनाथबाबांनी दरवाजा उघडला तेव्हा ते म्हणाले. "अरे दोन तास बाहेर उभा कां? तू कोठे राहतोस? जवळच ना? मग चल तुझ्या घरी. कचरनाथबाबा उघड्या अंगाने कोलभाट लेनमधील बाबांच्या खोलीवर आले. कचरनाथबाबांचा चालण्याचा वेग एवढा होता की बाबांच्या पुष्कळ अगोदरच तेथे पोचले. त्यानंतर बाबा व त्यांच्या पत्नि आल्या. कचरनाथबाबा कॉटवर बसले. थोड्याच वेळात त्यांनी दोन्ही हातानी आपले तोंड झाकून ते म्हणू लागले "माझा देव उपाशी आहे. माझा देव उपाशी आहे." व आपल्याच तोंडावर मारून घेऊ लागले. बाबा त्यांना आवरण्याचा प्रयत्न करू लागले. दोघांच्याही डोळयातून अश्रू वाहत होते. आजुबाजूला लोकांची गर्दी झाली. लोक आश्चर्य करू लागले. थोड्याच वेळात कचरनाथबाबा शांत झाले नंतर कचरनाथबाबांनी, कदमबाबांच्या पत्निस जेवण वाढण्यास सांगितले. जेवण वाढल्यानंतर कचरनाथबाबांनी त्या दांपत्यांस भरविले. जाताना त्यांनी बाबांना आशीर्वाद दिला. ते म्हणाले, "तू देवाचा लाडका आहेस. मी तुला काय देणार? तू तुझे जनसेवेचे काम चालूच ठेव." कचरनाथ बाबांसारख्या संताचा आशिर्वाद मिळाल्याने बाबांना खूप आनंद झाला व त्यांनी आपले जनसेवेचे कार्य जोमात चालू ठेवले.

श्रीकदमबाबा पहाटे ५ ला उठत, प्रातःविधी आटोपून, पूजाअर्चा करून ते ७ ते ८ वाजेपर्यंत येणाऱ्या लोकाना अंगारा देणे, त्यांचे प्रश्न सोडविणे वगैरे करत. ८ वाजता ते कामावर जात असत. कित्येक वेळेला त्यांना कामावर जायला उशीर होई व त्यामुळे त्यांचा पगार कापला जाई परंतु त्यांनी त्याची पर्वा केली नाही. ते ८ ते ५॥ पर्यंत प्रेसमध्ये काम करत. व संध्याकाळी ६ वाजता परत येत. पुढे पुढे तर लोक त्यांच्या प्रेसवर देखील जात. संध्याकाळी घरी आल्यानंतर पुन्हा रात्री १२ वाजेपर्यंत त्यांचे कार्य चाले. त्यांना जेवण खाण्यास देखील सवड मिळत नसे. बाबांच्या घरी लोकांची रीघ लागत असे व त्या लहानशा खोलीत त्यांच्या कुटुंबाला फारच गैर सोसावी लागे. त्यांच्याकडे सर्व जातीधर्मांचे, पंथाचे, गरीब, श्रीमंत, सुशिशित, अशिक्षित, असे सर्व प्रकारचे लोक येत. परंतु ही सेवा ते निरपेक्ष बुद्धिने

करीत असत. कोणाकडून एक पैसा देखील घेत नसत. बाबांकडून अनेक लोकांना गुण आलेला आहे. काही बाबतीत तर चमत्कार घडलेले आहेत. असे अनेक चमत्कार आपल्याला ऐकावयासही सापडतात. परंतु बाबांचा अलौकिक गुण म्हणजे नम्रता, लहान मुलगा असो, म्हातारा असो. स्त्री असो अथवा पुरुष असो. सर्वांना हाक मारताना ते म्हणत "काय देवा !"

जणू काय सर्व माणसात त्यांना देवाचेच दर्शन घडत असे व त्यांची सेवा करताना त्यांना देवाची सेवा केल्याचे समाधान लाभत असे. ज्याप्रमाणे फुलाफळांनी बहरलेला वृक्ष वाकतो, नम्र होतो. त्याचप्रमाणे संत देखील आपल्या सद्‌गुणांनी, आपल्या सत्कार्यांनी नम्र झालेले असतात.

श्रीबाबांना जणू जनसेवेचे वेडच लागले होते. जणू काय चिराबाजारातील आपली सेवा कमी आहे असे जाणून त्यांनी चेंबूर येथे आपले कार्य सुरू केले. हे कार्य त्यांनी १९४८ साली सुरू केले. त्यावेळी चेंबूर विभाग हा मागासलेला होता. तेथे फारशी वस्ती नव्हती. जी होती ती देखील गरीब व मागास-वर्गीयांची. अशा परिस्थितीत त्यांनी चेंबूर स्टेशनजवळील स्मशानभूमीत असलेल्या छोट्याशा पडक्या देवळात आपले कार्य सुरू केले. दर रविवारी व सुटीच्या दिवशी दुपारी बाबा तेथे जात. त्याच जागेवर बाबांनी एक छोटेसे देऊळ बांधले आहे व त्या देवळात आपल्या इष्टदेवतेची म्हणजे श्रीदत्तगुरुंची मूर्ती त्यांनी स्थापिली आहे. ह्या देवळात महा-शिवरात्र, दत्तजयंती, गोकुळ अष्टमी हे उत्सव सुरू केले. चेंबूर स्टेशनच्या परिसरात एकही देऊळ नव्हते. त्यामुळे हे देऊळ बांधून बाबांनी लोकांची अडचण दूर केली व लोकांचा भाविकपणा वाढविला. बाबांनंतर त्यांच्या पत्नीने म्हणजे आईसाहेबांनी बाबांचे कार्य त्या देवळात चालू ठेवलेले आहे. येथे प्रवचने, कीर्तने सतत चालू असतात. निरनिराळे उत्सव होतात. ह्या स्थानाला अनेक संतांनी व सत्पुरुषांनी भेटी दिलेल्या आहेत व काहींनी तर असे उद्‌गार काढले आहेत की, हे प्रतिगाणगापूर आहे.

एका बाजूने बाबांचे वय वाढत होते. परंतु त्यापेक्षा जलदगतीने त्यांचे कार्य वाढत होते. त्यांना क्षणाची विश्रांती मिळत नसे. वेळेवर अन्न खाण्यास फुर्सत नसे. परंतु त्यांनी कधी तक्रार केली नाही, अथवा पर्वा केली नाही. आपले कार्य नेटाने चालू ठेवले. अशाच एके दिवशी ते कामावर असताना त्यांना १०–३–७४ रोजी देवाज्ञा झाली.

त्यांनी केलेली सेवा देवाघरी रुजू झाली. त्यांनी केलेल्या अविश्रांत सेवेनंतर त्यांना चिरविश्रांती देण्यासाठी त्या परमेश्वराने त्यांना आपल्या घरी नेले. नेले ते देखील कोणत्या दिवशी तर तुकाराम बीजेच्या पुण्य दिवशी.

जन्म एकादशीला व मृत्यु तुकाराम बीजेला. जन्म व मरण देखील शुभ दिनी येणे हे फक्त पुण्यवान माणसाला लागते.

बाबा देहरूपाने जरी ह्या जगातून गेले तरी त्यांच्या कार्याच्या रूपाने ते अमर झाले आहेत. त्यांचे कार्य पुढे चालू ठेवण्यानेच आपण त्यांच्या ऋणातून मुक्त होऊ व त्यांच्या आत्म्यास शांती लाभेल. बाबा आपल्या भक्तांना अजूनही दृष्टांतात दर्शन देऊन मार्गदर्शन करतात.

# अहो, हा उदीचा परिणाम !

## श्री. लिमयेबाबांना आलेले दोन अजब अनुभव.

* एका गुरूवारी रात्री माझ्या सौ० ची मैत्रीण आपल्या वहिनीला घेऊन दरबारात आली. वहिनीचा हात बँडेजमध्ये अडकवलेला होता. मी तिला विचारले काय झालंय? त्यावर ती म्हणाली "गेले तीन महिने हात भयंकर दुखत असून वरखाली सुद्धा करता येत नाही." तिने डॉक्टरने लिहून दिलेल्या औषधाची व इंजेक्शनची यादी माझ्यापुढे टाकली, व मला म्हणाली की, उद्यापासून हा कोर्स मी चालू करणार आहे, त्यापूर्वी बाबांचा आशीर्वाद घेण्यासाठी आले आहे. बहुतेक हृत्तिरोग झाला आहे असं डॉक्टरांचं निदान आहे. मी तिचा हात बँडेजमधून बाहेर काढण्यासाठी धरला तोच भयंकर वेदनानी ती विव्हळू लागली. मी हलकेच मंतरलेल्या तेलाचा व बाबांच्या उदीचा हात तिच्या हातावरून फिरवून पुन्हा तिचा हात बँडेजमध्ये घातला, व सांगितले की अर्ध्या तासात बँडेज सोडून टाक, तिचा या गोष्टीवर विश्वास बसत नव्हता. तिला वाटले मी चेष्टा करतो की काय? तिने परत



श्री. लिमये बाबा

परत औषधाबद्दल विचारले तेव्हा सांगितले की हात बरा झाला नाही तर तो प्रश्न उभा राहील तेव्हा उद्या पाहू !

ती आपल्या नणंदेसह माझ्या सौ.कडे गेली. त्यांच्या तिथे अर्धा तास गप्पागोष्टी झाल्या, आणि त्या जायला निघाल्या, तेव्हा तिची नणंद म्हणाली "वहिनी, बाबांनी अर्ध्या तासानंतर बँडेज सोडायला सांगितले आहे." आणि आता तर अर्धा तास झाला आहे. "इथंच सोडून पाहू. दुखला तर ताबडतोब त्यांच्याकडे जाता येईल."

वहिनीच्या नणंदेने आठवण करून देताच त्यांनी बँडेज सोडलं, आणि श्रीसाईकृपेने आश्चर्याची गोष्ट म्हणजे, बँडेज सोडताना हात तर दुखला नाहीच उलट पूर्वीप्रमाणे हाताची हालचाल होऊ लागली. यत्किंचितही न दुखता तिला असा त्रास झाला की यापूर्वी हात कधी दुखतच नव्हता.

त्या सर्वजणी त्वरीत दरबारात आल्या आणि आनंदातिशयाने सांगू लागल्या, "बाबा माझा हात पूर्णपणे बरा झाला आहे." तिला म्हटलं दोन दिवसानी पुन्हा कळव दोन दिवसांनी निरोप आला. हातामध्ये काहीही दुखापत नाही.

साई भक्तांनो, असं काही पाहिलं, अनुभवलं की क्षणभर मती कुंठीत होते. भक्ताची काळजी बाबा किती म्हणून घेतात सांगू ? छोट्याशा सेवेची सुद्धा ते नोंद घेतात. मी तर त्यांचा एक लहानसा सेवक पण माझ्या हातात सुद्धा ते नकळत चमत्काराची संजीवनी देतात. आणि दरबारात येणाऱ्या शेकडो भक्तांच्या दुःखावर, वेदनांवर त्वरीत उपाय सुचवितात.

श्रीसाईबाबांच्या पवित्र चरणांशेजारी बसून त्यांचा मी एक लहानसा सेवक हेच म्हणेन "तुम्ही कुठेही असा सुखात असा, संकटात असा. श्रीसाईंचे मनोभावे ध्यान करा. सुखाच्या क्षणी ते तुम्हाला गर्व होऊ देणार नाहीत. संकटकाळी ते तुमच्या मदतीसाठी धाऊन येतील. कारण बाबा हे अवतारी पुरुष आहेत. जळी, स्थळी, काष्ठी पाषाणी जेथे जेथे त्यांच्या नावांचा उच्चार होतो तेथे-तेथे मायेचा आशिर्वादाचा मोरपिशी हात पाठीवरून फिरविण्यास ते नेहमी हजर असतात.

---

**श्रीसाईबाबा षष्ठ्यब्दी महानिर्वाण महोत्सवानिमित्त**

**श्रीसाईलीलाचे वर्षभर खास अंक**

संपूर्ण योजना पुढील अंकी वाचा

साई सच्चरित्रकार कै. गोविंदराव दाभोलकर यांचे पाऊणशे वर्षाचे चिरंजीव डॉ. गजाननराव यांची सुरम्य मुलाखत पुढील अंकी वाचा.

श्रीसद्‌गुरु श्रीसाईबाबांना कुसुममाला अर्पिताना



श्री स्वामी मुक्तानंदजी नमो नमः

परमहंस श्रीमुक्तानंदबाबा, गणेशपुरी, वज्रेश्वरी

# श्रीसाई डॉक्टरांचे डॉक्टर !

एक मुलगी एका कंपनीत नोकरीला जात असे. का कोण जाणे पण तिचं डोकं नेहमी दुखायचं एवढं की अनेक वेळा ती चक्कर येऊन बेशुद्ध पडायची. एक्सरे काढून झाला, शॉक ट्रिटमेंट झाली. डॉक्टरी उपाय तर चालूच होते.

तिच्या काही मैत्रिणी आमच्या दरबारात नेहमी येणाऱ्या होत्या, एके दिवशी त्या मुलीला भर रेल्वे स्टेशनातच चक्कर आली. तेव्हा तिच्या मैत्रिणींनी शेवटचा उपाय म्हणून, बाबांच्या दर्शनाला आणायचं ठरवलं. एके दिवशी दरबार भरलेला असताना तिला त्या सायंकाळी घेऊन आल्या, आणि माझ्या कानावर सर्व हकिगत घातली.

मी बाबांची उदी घेतली. तिच्या कपाळाला लावली व त्याच उदीच्या व्हायब्रेशन्स तिच्या डोक्यामध्ये सोडल्या पाच मिनिटात तिला एकदम बरं वाटू लागलं. तिला विचारलं तर ती मुलगी सांगू लागली की माझ्या मेंदूला काहीतरी गार-गार लाटांसारखा सुखद स्पर्श होत होता. नवलाची गोष्ट म्हणजे कित्येक दिवसांचा तिला जडलेला तो आजार, परंतु दरबारात बाबांची उदी लावल्यापासून आजतागायत चुकून कधीही तिचं डोकं दुखलं नाही की, चक्कर देखील आली नाही.

अशाच प्रकारच्या ५।६ शॉक ट्रीटमेंटस अयशस्वी झालेल्या केसीस एका डॉक्टरांनी माझ्याकडे पाठविल्या, आणि विशेष म्हणजे बाबांच्या आशीर्वादाने माझ्या हाताला गुण आला. डॉक्टरांना आश्चर्य वाटले. आश्चर्य वाटणं सहाजिकच होतं. कारण वैद्यकीय शास्त्र एवढं प्रगल्भ असताना सुद्धा एका उदीच्या समोर ते तोकडं पडतं म्हणजे काय ? तेव्हा डॉक्टर माझ्या एका मित्राला म्हणाले "एकदा त्या दरबारात जाऊन काय जादूटोणा आहे तो जाऊन पहायला हवा."

तेव्हा त्या डॉक्टरांना माझा मित्र म्हणाला "डॉक्टर, तिथं जादू-टोणा-भानामती वगैरे काहीही नाही. चमत्कार आणि प्रताप जर कुठला असेल तर तो श्रीसाईंचा, पायाशी रुजू झालेल्या असीम सेवेचा आणि त्यांच्या उदीचा"

त्यानंतर एका उत्सवाला डॉक्टर महाशय दरबारात आले होते. त्यांनी श्रीसाईंच्या मूर्तीचे दर्शन घेतलं परंतु त्यांच्या शक्तिचं दर्शन झालं की नाही हे त्यांचं त्यांनाच ठाऊक !

श्रीसाईंनी नमस्कारासाठी कधी चमत्कार केला नाही. ज्यांनी बाबांचं नाव घेतलं त्यांना त्यांच्या समाधीचं हमखास दर्शन घडत, आणि त्यांची समाधी नवसास पावली नाही असा कुठल्याही साईभक्ताला अनुभव नाही.

★

# श्रीसाई-आरती व उदी

—डॉ. अनिल जायस्वाल
द्वारा श्रीसाई क्लिनिक, चितारओळ,
नागपूर–२, पिन–४४०००२ (महाराष्ट्र)



वाचकांनो ! आपणा सर्वांस सुख-दुःख भोगणे प्राप्त आहे. श्री. नाना-साहेब चांदोरकर, जे श्रीसाईसमर्थांचे परम निष्ठावान भक्त होते. त्यांना देखील खानदेशातील जामनेर नगरी मामलेदार असताना दुःखाने पछा-डलेच. स्वतःच्या कन्येस प्रसूतीसाठी त्यांनी स्वगृहीच बोलावले होते. तिचे दिवस भरले. पोट उमळले. असह्य वेदना होऊ लागल्या. परंतु प्रसूती काही होईचना.

सुईणी झाल्या,
वैद्य झाले,
कुशल–तज्ञ डॉक्टरही थकले.
सर्वांनी हात टेकले.

परंतु नानासाहेब होते थोर साईभक्त. श्रीसाई चरणी बसलेली त्यांची अगाध स्वरूपाची श्रद्धा–सबूरी मात्र किंचित देखील डगमगली नाही. कन्येचे पोट दुखत असताना तिला ते वारंवार धीर देत होते. श्रीसाईबाबांचा धावा करण्याविषयी विन-वित होते; उपदेशित होते. सदैव साईंची 'उदी' बाळगणाऱ्या नानासाहेबांजवळ या प्रसंगी 'उदी'च नव्हती. नानासाहेब मनातल्या मनात बाबांना विनवित होते. सारखा नामजप चालू होता. त्यांच्या चेहऱ्यावरील तेज व गांभिर्य किंचितही कोमेजले नाही. आपल्या श्रीसाई माऊलीवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. श्रीसाई जे काही करतात, घडवून आणतात ते सर्वकाही पूर्वनियोजित व भक्तांच्या कल्याणार्थच असते. पूर्ण विश्वासयुक्त भक्तांच्या हाकेद्वारे श्रीबाबांचे मन पाझरते, कळवळते. श्री. नानासाहेब विचार करत होते :—

अशा प्रसंगी–विकट प्रसुती ।
मिळो बाबांची उदी–आरती ॥
मनोमनी नाना प्रार्थिती ।
साई–गुरुरायाच तारीती ॥

इकडे शिर्डीतील द्वारकामाईत बसलेल्या श्रीसाईंचे मन हळहळले. त्वरित त्यांनी श्री. माधवराव देशपांडे यांना बोलाविले. जामनेरास आरती व उदी रामगीर बुवांच्या हस्ते पाठविण्याविषयी फर्माविले. रामगीर बुवांस श्री बाबा प्रेमाने 'बापूगीर' म्हणायचे. ते खानदेशातीलच एका गावचे रहिवाशी होते. गावास परत जाण्याविषयी श्रीबाबांची आज्ञा मिळवावी–याच उद्देशाने–बापूगीर बुवांनी नेमक्या त्या क्षणीच द्वारकामाईत प्रवेश केला. परंतु श्री. देशपांडे मार्फत जेव्हा त्यांना बाबांचा आदेश मिळाला तेव्हा मात्र 'बापूगीर' बुवांची त्रेधाच उडाली. कारण खिशात मोजकेच पैसे, ते पण स्वगृही परत जाण्यास अपुरे पडणार. पैशा अभावी विरूद्ध दिशेस असणाऱ्या जामनेर नगरी "कसे काय जाता येईल ?" या विचारांनीच ते त्रस्त झाले. तरीपण काही एक उद्‌गार न काढता त्यांनी श्रीसाईसमर्थासमोर लोटांगण घातले. साष्टांग चरण वंदना केली. स्वतःच्या मनातील विचार मनातच ठेवले. आज्ञा शिरसावंद्य केली. श्रीसाईबाबांसमोर बोलण्याचे धाडस कोण करणार ? ते तर अंतर्यामी, त्रिकालदर्शी आहेत. बापूगीर बुवांच्या मनातील फिरत असलेले विचारचक्र ओळखून श्रीसाईनाथ म्हणतात :—

"तू स्वस्थ जाई ।
लागेल तुझी सर्व सोयी ॥"

—(अध्याय ३३—श्रीसाईसचरित्)

त्यानंतर बापुगीरांनी कष्टी मनाने शिर्डी सोडली. जळगाव मार्गे जामनेरस्थित श्री. नानासाहेब चांदोरकरांच्या कचेरीत ते कसे काय पोहचले हे सर्व श्रीसाईसच्चरित्रातील अध्याय ३३ मध्ये वर्णिले गेले असून ते वाचक वर्गास विदितच आहे.

तरी पण बापुगीर बुवांस स्वतः श्रीसाईंनी नानासाहेबांचा टांगा चालविणाऱ्या शिपायाचे वेष धारण करून त्यांना कशी काय भुरळ पाडली–या घटनेचे वर्णन श्रीपाद बालकृष्ण देव यांनी साईप्रेरणेनुसार फारच मनोरंजक रीतीने केलेले आहे.

महाभारतात श्रीकृष्ण भगवंत अर्जुनाच्या रथाचे सारथी झाले तर या कलीयुगात श्रीसाईसमर्थ बापुगीर बुवांचे सारथी बनले. जळगाव स्टेशनावर येताच बापूला भूक लागली. इतक्यात एका टांगेवाल्याने ललकारी मारली—

"शिरडी बापुगीर लाला ।
जामनेर जानेवाला ॥

ऐसा आदमी आया होगा ।
ये गाडी से कोई ॥१॥"

—(कीर्तन-पंचक ३८ पद। पहली ओळ)

आपणच तो इसम आहोत म्हणून तांगेवाल्यारूपी श्रीसाई सारथ्यास बापुगीर सांगतात—

"मैं हूँ आदमी वो हि शिरडी का ।
तपास मत कर जादा ॥
तेरे गाडी में आता हूँ ।
जरा देर ठेर रे शिपाईदादा ॥"

—(कीर्तन-पंचक ३९ वे पद)

शिपाई बनून आलेल्या सारथ्याचा-म्हणजेच श्रीसाई बाबांचा पोषाख व चेहरा कसा होता ? तर—

कल्लेदार मिशा, तशा बहुतशा, दाढी बडी फांकडी ॥
पल्लेदार सुबंद अंगरखाही ती बांकडी पागडी ॥
शिल्लेदार इजार कंबरपटा, हातीं छडी नेटकी ॥
शिपाई गडी झोंकदार नटला, साई जगन्नाटकी ॥

—(कीर्तन-पंचक पृष्ठ-१६)

मार्गात रथ उभा करून सारथी घोड्याना पाणी पाजतो व आपण दोघे काही खाऊ असे बापूना सांगितल्यावर बापुगीर भुकेने व्याकुळ असल्यावरही शंका करीतो-

"सुनो शिपाईराव बात मेरी ।
कहो यार कौन जात तुमारी।"

— (किर्तन-पंचक / पद ४८)

त्याचे शंकानिरसन सारथीरूपी साईंनी खालील प्रकारे केली :—

"भाई मैं हिंदू, क्षत्री राजपूत,
गढवाल मेरी जात ॥
नहीं म्लेंच्छ यवन, नहीं मुसलमान,
साब मेरा वोहि बम्मन ॥
साबनें दीया,
चीज खानेकूं,
नहीं हरजा
तुमकु लेनेकू ॥ १ ॥

—( किर्तन-पंचक / पृष्ठ १७ )

जे काही फराळाचे होते, ते अमृतापेक्षा गोड असावे व देवादिकांनाही स्वर्गात तसले भोजन अशा एकांत ठिकाणी श्रीसाई समवेत लाभणे कठीणच म्हणावे लागेल. असो.

नंतर शिपाई रूपी साई
व टांगा कसा काय
अदृश्य झाला. – हे सांगणे नको.

निर्मळ अंतःकरणयुक्त भक्तांच्या हाकेस श्री साईमाऊली कशी धावून जाते व सहायता करते ? त्या पवित्र उदी व आरती द्वारे श्रीनानासाहेबांच्या कन्येचे बाळंतपण निर्विघ्नपणे पार पडले.

वाचकांनो ! अद्यापही हिच आरती मध्यान्ह आरती म्हणून संबोधीली जाते. व शिर्डी साईमंदिरात ह्याच आरती द्वारे दुपारी १२ च्या सुमारास भक्त समुदाय अद्यापही आळवितो.

जणु काही,

"आमच्याही प्रसवसम
वेदनारूपी कष्ट,
विघ्न, संकट, दुःख, पिडा–या सर्वांचे
निवारण करून
ज्याप्रमाणे श्री चांदोरकरांच्या सहाय्यतेस
आपण धावून गेलात,
त्याचप्रमाणे आम्हासही
कोणत्या वेषात भेटून
या दुःखरूपी-डोहातून
काढावे।
व बापूगीर गोसावीस
लाभलेल्या सारथ्या प्रमाणे
आम्हासही
मार्गदर्शन करून
निश्चित–स्थळी
पोहचवावे।"

— अशीच श्री साईनाथांची
चरण–वंदना,
भक्त-समुदाय करिता असावा
— असे वाटते.

★

## श्रीसन्त गजानन महाराज शेगाव



शंभराव्या प्रकटन महोत्सवानिमित्य कोटीकोटी प्रणाम

# आमचा उदी अनुभव

—डॉ. सुमती खानविलकर
सीता कुंज, लोणावळा

● माझी मुलगी शैलजा हिला दिवस गेले. सातव्या महिन्यात माहेरी आणली. पहिलीच खेप. पुण्यात जाऊन एका नामांकित डॉक्टरांकडून तपासून आणली. त्यांनी सिझर करावे लागेल असे सांगितले. कारण मुलगी ठेंगणी व नाजूक बांध्याची. काय करावे, पुण्यात रहाण्याची सोय नव्हती म्हणून लोणावळ्यातल्या प्रसिद्ध दोन डॉक्टरना दाखविली. त्यांनी पण तेच सांगितले की नॉर्मल डिलीव्हरी होणे शक्य नाही. मुलगी अशक्त आहे. योग्य काळजी घेणे.

आमच्या घरातील सर्वांचाच बाबांवर विश्वास. त्यामुळे मुलीने श्रीबाबांचे स्तोत्र वाचण्यास सुरू केले. नवव्या महिन्यात मुलाने श्रीसाईचरित्राचा सप्ताह लावला. माझे रोजचे वाचन चालूच होते. नववा महिना पुरा झाला आणि प्रसुती वेदना सुरू झाल्या. मी व डॉ. इंदू नाईक दोघींनी तिला सूचना दिल्या.

आमची होमिओपॅथीची औषधे सुरू होतीच. दोघींना पण काळजी. आपण डिलीव्हरी करायचे म्हणतो पण जर काय कमी जास्त त्रास झाला तर लोक व तिच्या सासरची माणसे आपणास काय म्हणतील ! पण आमचा श्रीबाबांवर पूर्ण विश्वास व मुलीचा पण विश्वास. या गोष्टीमुळे कोणत्याही तऱ्हेचे इंजेक्शन न वापरता, फॉरसेप-सुद्धा न लावता नॉर्मल डिलीव्हरी झाली. मुलगा झाला. साडेसहा पौंडाचा मुलगा झाल्यावर रडला. सारे व्यवस्थित झाले. हो ! एक औषध मात्र चालू होते, आणि ते म्हणजे 'उदी' पाण्यात घालून ते तीर्थासारखे देणे. आपल्या बाबांच्या पोथीत अशीच केस सोडविल्याचे उदाहरण आहे. आता सुद्धा बाबांच्या नामस्मरणाने, त्यांच्यावरील विश्वासाने आणि उदीरुपी औषधाने सुखरुप प्रसूती झाली. आता तो मुलगा साडेतीन वर्षांचा आहे. चांगला निरोगी व हुषार आहे. त्याचे नाव आम्ही अवधूत ठेवले कारण तो दिवस गुरुवार होता व त्यात बाबांची कृपा. आपले बाबा अजून जिवंत आहेत. फक्त विश्वास पाहिजे.

# सर्वात प्रभावी औषध-उदी ! उदी ! उदी !

-श्री. जी. बी. वायसे
बी. ए. एलएल. बी. ॲडव्होकेट
चिंचवड गांव,पडवळ आळी पुणे, ३३

प्रिय वाचकहो, आपणास श्री. बाबांचे विषयी जी माहिती किंवा अनुभव आहेत. त्यापेक्षा मी अधिक सांगणार आहे असे नाही. कारण श्री बाबा हे सर्वांचे पाठीराखे व रक्षण कर्ते असल्यामुळे आपणा प्रत्येकांना वेळोवेळी अनुभव येत असून, श्री बाबा हे सदैव भक्तांच्या पाठीशी असतात. हे आपणास दिसून आले असेलच.

असाच अनुभव मी आपणापुढे ठेवीत आहे. मी दिनांक १६/१/१९७८ रोजी चिंचवड गावातून मुंबई पुणे रोडने पुण्याकडे स्कूटरवर चाललो होतो. पाठीमागे मुलगी बसली होती. सदर रस्ता हा नेहमी गजबजलेला असून तेथे नेहमीच अपघात होतात. मी कासारवाडी नजीकच्या 'मा. दाईची' कंपनी समोर आलो असताना समोरून ३०–३५ कि. मीटर वेगाने एक सायकलस्वार पुणे कडून मुंबई या दिशेने वेगात चालला होता. माझे पुढे दोन बसेस असल्याने त्यांच्या पाठीमागून स्कूटरवर अंतर ठेवून चाललो होतो. इतक्यात सायकलस्वाराने दोन्ही बसेस् गेल्यावर अचानक उजवे बाजूस बसेसच्या पाठीमागे काहीही वाहन नाही, असा समज करुन रस्ता क्रास करण्याकरिता उजवे बाजूस वळला तो वळण घेत असताना त्याच्या व माझे मध्ये फक्त दहा फूटाचे अंतर होते त्यामुळे तो माझ्या स्कूटरला धडक देणार हे स्पष्टच होते व अशा आकस्मीत घटनेनेही त्यापासून मी माझा बचाव करु शकणार नव्हतो माझ्या पाठीमागूनही वाहने येत होती.

सायकलस्वाराने माझ्या स्कूटरला धडक दिल्याने मी व मुलगी रस्त्याचे कडेने पाच फूट अंतरावर रस्त्यावर पडलो त्यामुळे मागील वाहने आम्हास वाचवू शकली. स्कूटरचे सहाशे रुपयापर्यंत नुकसान झाले मी शुद्धीवर नाही असे पाहताच सायकलस्वार सायकल घेवून पळून जावू लागला. नेहमीच्या अपघातातील अनुभवावरून स्कूटरच्या पाठीमागे बसणाऱ्यास जास्त मार लागतो. परंतु श्रीसाईकृपेने मुलीस खरचटण्यापलिकडे काहीच झालेले नाही. तिने लोकाना सांगून सायकलस्वारास पकडले व लोकांनी त्यास मार दिला. मला रस्त्यावरून उठविल्यावर आपण येथे कसे या संभ्रमात मी होतो. कारण स्मृती भ्रंशामुळे मला तावडतोब आकलन झाले नाही. सायकलच्या धडकेमुळे मी डांबरी रस्त्यावर पडल्यामुळे अंगावरील कपडे रस्त्यावरील घर्षणामुळे फाटले होते, उजवे खांद्यास मुका मार लागल्यामुळे हात वर करता येत नव्हता.

मला ससून हॉस्पीटलमध्ये जाण्यास सांगितले. तेथील केस पेपर नंबर एम. एल. सी ७४९ दिनांक १६/१/१९७८ प्रमाणे डॉक्टरांनी उजवे बाजूचे गळ्याचे हाड मोडले असल्याचे सांगीतले व २/३ महिने पाठीवर दोन खांद्यामध्ये आठ या आकाराच्या बॅंडेजमध्ये राहावे लागेल असे सांगीतले कारण अशा ठिकाणी प्लॅस्टर करता येत नाही. हात हालविता येत नसल्यामुळे अंगात कपडेही घालता येत नाही. परंतु मी श्री बाबांचे स्मरण करुन नित्य व्यवहार रोज करीत होतो. डॉक्टरी उपायांनी तीन महिने एका जागेवर पडून राहाणे मला शक्य नव्हते. आणि यातून श्री बाबा बरे करतील अशी माझी श्रद्धा असल्यामुळे मी डॉक्टरी उपाय करुन घेतले नाहीत. फक्त उदी व स्मरण हेच बाबांचे औषध चालू ठेवले. पुढे आठ दिवसामध्ये चांगली प्रगती होवून हात काम देऊ लागला. मित्र परिवार डॉक्टरी उपाय करण्यासाठी आग्रह करीत होते. परंतु मला ते योग्य वाटेना व उदी व बाबांचे वरील श्रद्धा हेच उत्तम औषध वाटत होते.

पुढे मी तीन आठवड्यांनी डॉक्टरांना खांदा व हात दाखविला तेव्हा त्यांनी हाड जुळून आले आहे असे सांगितले. परंतु अजून एक महिना तरी बॅंडेज असणे आवश्यक आहे असा सल्ला दिला. परंतु मी तसे काही न करता आज मितीस श्रीसाई कृपेने चांगला बरा झालो आहे. ही बाबांची कृपा कमी आहे का !

विशेष म्हणजे पाठीमागे बसणाऱ्या माझ्या मुलीस मार लागला नाही हे एक प्रकारे विशेषच होते. माझ्या अंगावरील कपडे रस्त्यावरील घर्षणांनी फाटले होते परंतु त्वचेला काही झाले नाही. फक्त कोपरात थोडे खरचटले. अपघात पहाणाऱ्यांनी व पोलीस चौकीच्या पोलीसांनी सांगितले की, ही अपघाताची जागा घातकी (भुताटकीची) आहे. येथे नेहमी अपघात होतात परंतु आजपर्यंत अपघातातून कोणीही बचावलेला नाही. सर्व मेले, तुम्ही भाग्यवान आहात. परंतु यात मी भाग्यवान नसून सतत पाठीशी असलेल्या बाबांनीच मला वाचविले व गळ्याजवळील हाडही त्यांनी नीट केलेच. बाबांच्यावर श्रद्धा असल्यामुळे आज मी तुमच्यापुढे हा अनुभव ठेवण्यासाठी जिवंत आहे ही केवढी बाबांची अगाध लीला. अशा सतत पाठीशी असणाऱ्या श्रीसाईबाबांना शतशः प्रणाम. त्याचप्रमाणे श्रीबाबा त्यांचे सर्व भक्तावर अशीच माया ठेवोत हीच श्रीचरणी प्रार्थना.

# उदी नोहे नुसते भस्म

श्री· विजय द, हजारे
सी / ६, गुंफादर्शन फर्स्ट कार्टर रोड;
बोरीवली पूर्व, मुंबई नं. ४००,०६६

या जगात मानवनिर्मित असे अनेक धर्म आहेत. विविध पंथ आहेत. भक्ती मार्गाचे निरनिराळे असे अनेक प्रकार आहेत. त्यात मूर्तिपूजा, व्यक्तिपूजा मानणाऱ्या करणाऱ्या भक्तगणांचा असा एक एवढा भला मोठा वर्ग आहे की "देव आहे" असं मानणाऱ्या सर्व "आस्तिका" मध्ये त्याच वर्गाचं प्रस्थ जास्त असलेलं दिसून येईल. मला वाटतं आपल्या सर्वच साईभक्तांचा समावेश त्याच वर्गात करता येईल.

परमेश्वर, मग त्याला कुठल्याही नावान ओळखा अथवा हाक मारा, तो भिन्न भिन्न पंथाचा, नावाचा, धर्माचा असला तरी एकच असतो. त्याच्या ठायी प्रत्येकाची—त्याच्या प्रत्येक भक्ताची—त्या त्या प्रमाणार श्रद्धा असते, आणि आपापल्या श्रद्धेप्रमाणे, निष्ठेप्रमाणे, विश्वासाने तो (भक्त) आपल्या देवाची पायधुळ मोठ्या भक्तीभावाने आपल्या कपाळी, डोक्याला, गळयाला लावतो. कुणी त्याला 'कुंकू' म्हणतात. काहीजण "विभूती" म्हणून त्याला संबोधतात तर आम्ही समस्त साईभक्त "बाबांची उदी" म्हणून ती कपाळाला लावतो. अमृत· तुल्य म्हणून जीभेवर ठेवतो.

तर "उदी" म्हणजे काय ? ह्या प्रश्नाचं उत्तर "उदी म्हणजे उदी" हेच देता येईल. बाबांच्या "द्वारकामाईत" बाबांनी आपल्या अदृश्य शक्तीद्वारे विस्तव (आग) निर्माण करून जो 'धुनी' पेटविला—आज वर्षानुवर्षं तो अखंडपणे जळत आहे आणि आकाशात सूर्य चंद्र तारे असेपर्यंत तो तसाच धगधगत रहाणार आहे. त्यातील राखेची चिमटी म्हणजेच एक प्रकारचे संजीवनी भस्म ! तीच ती उदी ! बाबांची पायधूळ म्हणा अथवा बाबांचा प्रसाद म्हणा. मद, मोह, मत्सर, काम क्रोध, लोभ वगैरे विकारांचा नाश करणारी दवा म्हणजेच 'उदी' असे म्हणावे लागेल. आज बाबांची 'उदी' लावून अनेक असाध्य रोग म्हणता म्हणता नाहीसे झाले आहेत. 'उदी'ची शक्ती आणि प्रचिती घेतलेले आणि घेणारे तुमच्या आमच्यासारखे अनेक साईभक्त आहेत. म्हणूनच 'बाबांची उदी' म्हणजे दुसरे तिसरे काही नसून ह्या कलीयुगातले कुठल्याही साध्य असाध्य रोगराईवरचे 'जालीम औषध' आहे असेच म्हटले पाहिजे.

नाहीतर 'बाबांची उदी' लावताच आमच्या सौ. चे अचानक थंडगार पडलेले अंग, मंद मंद होत चाललेला श्वासोच्छवास काहीही औषध न घेता (मध्यरात्री ते मिळण्याची अजिबात शक्यता नव्हतीच.) काही तासातच नियमित (नॉर्मल) स्थितीवर येऊ शकला नसता. बाबांच्या कृपाप्रसादाचे फळ म्हणून असलेली आमची लहानगी एक वर्षाची 'कृपा' 'बाबांच्या उदी'मुळे अचानक उद्भवलेल्या 'ताप, सर्दी, खोकला' सारख्या आजारपणातून औषधपाण्याशिवाय, डॉक्टरांची पायरी न चढता अगदी खडखडीत बरी होऊन प्रत्येक वेळी चांगली नाचू बागडू लागते तसे झाले नसते.

कोणीही साईभक्त, शिरडीच्या बाबांच्या दरबारात असो, दादरला साईनिकेतन मधील बाबांच्या मूर्तिसमोर असो, बोरीवलीच्या साईमंदिरात असो किंवा लॅमिंग्टन रोड अथवा फणसवाडीच्या बाबांच्या देवळात असो 'बाबांची उदी' आपल्या कपाळी लावून पावन होताना उदीचे काही कण जीभेवर ठेवून पोटात साठविताना त्याच्या मनात एकच विचार, एकच भाव असतो आणि तो म्हणजे 'बाबा तुमची ही उदी तुमचा हा प्रसाद मी मिळवला आहे तशीच तुमची कृपा, तुमचा वरदहस्त आमच्यावर सदैव राहू द्या.'

'बाबां'च्या तसबिरीजवळ अथवा मूर्तिजवळ जो काही ऊद–धूप जाळला जातो, उदबत्त्या पेटत ठेवल्या जातात त्यांच निर्माल्य होऊन भस्मरूपात जे काही उरतं त्याला वास्तविकतेनं "उदी" म्हणून म्हटलं तरी "उदी"चा सखोल गूढार्थ आणि साईभक्तांच्या असाधारण अनुभूतींतून, अनुभवांतून व प्रचितीतून साकारलेला "उदी"चा भावार्थ वेगळाच आणि तो म्हणजे :—

"उदी" नोव्हे नुसतें भस्म  
राख अथवा कुंकू गंध  
साईश्रद्धेचा प्रसाद 'उदी'  
संजिवनी ती सुगंध.  
"उदी" घेतां भय नुरे  
आधीव्याधी मृत्यूचेहि  
'उदी'नेची पळूनी जाती  
भूतखेतांदी–वादळवारे  
जैशी 'हवा' जगभर वाही  
'उदी' तशी अमृत राही  
बाबांची ही पायधुळ  
"उदी" म्हणजे दुजे नाही.

卐

# उदी लावण्याची बाबांची पद्धत

– श्री. द. शं. टिपणीस

वजिफदार लॉज, गोखले रोड,

ठाणे (पश्चिम)

● बाबा कधी कधी स्वतः उठून धुनीतील उदी भक्तांच्या कपाळावर लावीत गर्दी असली तर भक्ताने उदी घेऊन ती बाबांच्या हातात द्यावी व मग बाबांनी ती भक्तांच्या कपाळाला लावावी. कधी कधी बाबांना श्रम पडू नयेत म्हणून कोणीतरी निकटचा भक्त पसाभर उदी घेऊन बाबांच्या शेजारी उभा राहत असे, उदी लावताना बाबा उजवा आंगठा भृकुटीच्या मध्यभागी व बाकीची चार बोटे माथ्यावर ठेवीत. आंगठा किंचित दाबून ते उदी लावीत, बाकीच्या बोटांच्या खुणा उघड्या माथ्यावर उमटत असत, स्त्रियांच्या केसावर त्या विशेष दिसत. उदी लावून झाल्यावर थोडी उदी ते भक्ताच्या हातावर देत मग भक्त बाबांच्या पाया पडून जात असे.

## उदीचा बोलका अनुभव

( अनुभव कथन–श्री तर्खड संस्थानचे एक जुने विश्वस्त व साईलीलेचे भूतपूर्व संपादक ) एकदा या उदीचा विलक्षण अनुभव आला. माझी पत्नी बिकट आजारी असता एक दिवस तिच्या माथ्यावर केसावर उदीच्या खुणा दिसल्या व तेव्हापासून तिच्या आजाराला उतार पडून ती पुढे पूर्ण बरी झाली. उदी खुणाबद्दल विचारता तिने एवढेच सांगितले की बाबा आपल्या उशापाशी बसलेले दिसले. पण आम्हाला मात्र काही ते दिसले नाही.

## उदीबद्दल बाबांचे आश्वासन

१९११ साली आम्ही बाबांच्या दर्शनास गेलो होतो. माझ्या कपाळास उदी लावून मला वाड्यात जाण्याची आज्ञा दिली, त्यानंतर माझी पत्नी पसाभर उदी घेऊन बाबां समोर उभी राहिली. बाबांनी नित्याप्रमाणे उदी लावली व विचारले, ' आये, इतकी उदी कशासाठी ?' पत्नी म्हणाली ' बाबा, उदी जवळ असली की तुम्ही जवळ असल्या सारखे आम्हास वाटते. ' बाबा म्हणाले, ' बरं बरं जा घेऊन. आपल्या बाळ गोपाळांना ती लई कामास येईल बरं जपून ठेवावी बरं. '' बाबांच्या स्थूल देह पतना नंतर धुनी २४ तास प्रज्वलीत नव्हती. त्या नंतर मात्र ती आजता-गायत प्रज्वलीत राहात आली आहे.

## शिर्डी संस्थानची प्रथा

१९२५ मध्ये पत्नी श्रीसाईचरणी लीन झाली व याच वर्षी संस्थानचे ऑ. खजिनदार श्री. दाभोळकर निवर्तले. त्या जागी माझी (श्री. तर्खड) नेमणूक झाली. पत्नीच्या संग्रही बाबांच्या हातच्या उदीचा बराच संग्रह होता. त्याचा बाबांच्या सांगण्याप्रमाणे सदुपयोग व्हावा म्हणून देणगीदारांना पावतीबरोबर बाबांच्या हातची तीन चिमुट उदी प्रसाद म्हणून धाडण्याचा मी प्रघात सुरू केला. देणगीदार गरीब की श्रीमंत, रक्कम लहान की मोठी कुठलाही भेद न करता सर्वांना फक्त तीन चिमूट उदी पाठवित असे. काही वर्षांनी हा संग्रह संपला. आता पुढे काय ? अशा विवंचनेत असता कै. दाभोळकर (हेमाडपंत) यांचे चिरंजीव 'बाबांच्या हातची उदी' असे लेबल असलेले दोन डबे घेऊन आले. कै. दाभोळकरांच्या चिरंजीवांना त्यांच्या पश्चात् घरच्या सामानात हे डबे मिळाले होते. मनाला समाधान वाटले, 'बाळगोपाळांना लई कामास येईल, जपून ठेव बरं,' बाबांच्या या संदेशाचे अंशतः तरी पालन आपल्या हातून होत आहे हे पाहून आनंद झाला. बाबांच्या योजना बाबांनाच माहित, हे खरं.

(साईलीला वर्ष ८ अंक ११–१२ च्या आधारे.)

## शिरडीतील श्रीरामनवमी उत्सव

सर्व साईभक्तांनाकळविण्यात येते की यंदा शिर्डी येथे श्रीरामनवमी महोत्सव शनिवार दि. १५ एप्रिल १९७८ ते सोमवार दि. १७ एप्रिल १९७८ पर्यंत नेहमी प्रमाणे थाटाने साजरा केला जाईल. सर्व साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून महोत्सवास हजर राहून संस्थानला शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वतोपरीने सहकार्य द्यावे ही विनंती. या उत्सवप्रसंगी सुमधुर गळ्यांच्या गायिका मधुबाला चावला व विमल पक्की या मंदिरात हजेरी लावणार आहेत. नेहमी प्रमाणे श्री. अनंतराव आठवले यांची किर्तन प्रवचने होणार असून गायक भक्त मंडळीही आपापली हजेरी लावणार आहेत.

संस्थानच्या साई निकेतन डॉ. आंबेडकर मार्ग, दादर येथल्या कार्यालयातही दि. १६ एप्रिल रोजी रामनवमी उत्सव साजरा केला जाईल व दुपारी १२ वा. आरती व प्रसादाचा कार्यक्रम होईल. तत्पूर्वी गायन, भजन, प्रवचन इ. कार्यक्रम नेहमी प्रमाणे होतीलच.

# साईंची अगम्य शक्ती

**श्री. पां. वा. भुतकर**
२३।१६७५ अभ्युदय नगर,
काळाचौकी, मुंबई नं. ३३

* सत्य हे कल्पिताहून अद्भूत असते असे म्हणतात. माझी तर पक्की खात्री आहे की वरील म्हणी पेक्षा साईंची शक्ती ही फार महान् शक्ती आहे. ह्या शक्तीने सारे चराचर व्यापून टाकले आहे.

मध्यंतरी दोन महिन्यापूर्वी शिर्डीस जाऊन आलो. एके दिवशी सकाळी उठल्यानंतर एका विचित्र व्याधीने मला भयग्रस्त केले. माझा घसा आतून सुजल्याचा मला संशय आला. घसा फारच दुखू लागला होता. इतकेच नव्हे त्याचा परिणाम माझ्या जिभेवर देखील झाला. मोठ्या प्रयत्नानेच मी बोलत होतो. घरच्या मंडळींना मी चकार शब्द बोललो नाही. निष्कारण काळजी नको. तशाच परिस्थितीत मी माझ्या कार्यालयात गेलो. दिवसभर बेचैनीतच काम केले.

संध्याकाळी घरी आल्यानंतर कपाट उघडले व शिर्डीवरून आणलेली उदी बाहेर काढली. हात पाय तोंड धुतले. माझ्या टेबलावर नुकतीच शिर्डीहून आणलेली साईबाबांची आशिर्वाद देणारी सुंदर फोटोफ्रेम आहे. त्या टेबलाजवळ खुर्ची ओढून ५–१० मिनिटे या फोटोकडे स्वस्थ चित्ताने पहात बसलो. बाबांच्या फोटोसमोर उदबत्ती लावली व उदीची पुडी ठेवून दिली. दहा मिनिटानी थोडीशी उदी बाबांच्या अनुमतीने घेतली व पेल्यात पाणी टाकून त्यात मिसळली. बाबांचे स्मरण केले व मनाशी संकल्प केला की त्या उदी मिश्रित पाण्याने उद्या सकाळी माझे दुखणे बरे झालेले असेल.

नित्याप्रमाणे रात्री ११ वाजता झोपी गेलो. झोप शांतपणे लागली. सकाळी जेव्हा जागा झालो त्यावेळी मी नेहमीप्रमाणे व्यवस्थीत होतो. घशाचे दुखणे पार पळाले होते. मला फार आनंद झाला व माझी खात्री पटली की ही जगाचे कल्याण करणारी शक्ती साधीसुधी नाही. ही फार प्रचंड शक्ती आहे. या शक्तीचे मोजमाप कोणीच करू शकणार नाही. साईंची शक्ती ही महान् बुद्धीवंतानादेखील भ्रमात पाडणारी अशी अगम्य शक्ती आहे. या शक्तीला माझे हे नम्र अभिवादन !

卐

# प्रभु श्रीरामचंद्राची निर्मोहावस्था

( लेखक :- श्रीअवधूत स्वामी महाराज लिमये )

नावलकर बिल्डिंग, दादर मुं. २८

● भगवान ब्रह्मदेवाने आदि नारायणाच्या प्रेरणेवरून सृष्टि निर्माण केली पण तिचे रक्षण कसे करावे हे त्याला समजेना तेव्हा त्याने त्या आदिदेवाची प्रार्थना केली, व त्याला प्रसन्न करून घेतले. तेव्हा तो सर्वश्रेष्ठ देव ब्रह्मदेवाच्या पुढे प्रगट झाला, व त्याला म्हणाला तू काळजी करू नकोस. तू निर्माण केलेल्या सृष्टीचे मी रक्षण करीन. सृष्टीचे काय, राष्ट्राचे व समाजाचे काय, कुटुंबाचे काय किंवा व्यक्तीचे काय, धारण पोषण स्वधर्माचरणाने होत असते. या धर्माचा लोप होतो तेव्हा अधर्म बळावतो व दुर्जन लोक बलवान होऊन साधूंचा म्हणजे माझ्या भक्तांचा छळ करतात. तेव्हा मी मनुष्यरूपाने अवतार घेतो व धर्माचे व साधुंचे रक्षण करतो. त्यासाठी माझ्या भक्तांना मी धर्मांचे भक्तिचे व माझ्या स्वरुपाचे ज्ञान देतो व ते प्रत्यक्ष आचरण करून दाखवतो. अशा रितीने निरनिराळ्या युगामध्ये व उपयुगामध्ये मी अवतार व उपअवतार या सृष्टीमध्ये घेतो. त्याने सृष्टीचे योग्य ते धारण पोषण होते व प्रजेला योग्य ते रक्षण मिळते.

अशाच परिस्थितीत त्रेतायुगाच्या शेवटी दशरथ राजाच्या पोटी महाविष्णूने प्रभू रामचंद्राचा अवतार घेतला. बालपणा पासूनच अवतारी पुरुषाचे सहा गुण-यश, श्री, ऐश्वर्य,ज्ञान, वैराग्य व औदार्य हे गुण त्याच्या ठिकाणी असल्यामुळे या संसारात जन्माला येऊन सुद्धा तो कोणाच्या व कशाच्याही मोहात पडला नाही व आपल्या चारित्र्याने संपूर्ण निर्मोहावस्था लोकांना जीवनात आदर्श घालून देण्यासाठी प्रगट केली. त्यामुळे प्रभू रामचंद्रावर त्याच्या माता पित्यांचे, सर्व अयोध्यावासी जनांचे व राज्यातील सर्व प्रजेचे अलोट प्रेम होते.

प्रभुराम सोळा वर्षाचा झाला व आता तो राज्याची जबाबदारी घेण्यास योग्य झाला आहे असे जाणून दशरथ राजाने त्याला यौवराज्याभिषेक करण्याचे ठरविले. परंतु त्या अगोदर आपल्या राज्यात हिंडून एकंदर प्रजेची परिस्थिती काय आहे हे पाहून येण्यास दशरथाने रामाला लव्याजम्यानिशी पाठविले. श्रीराम सर्व राज्यभर हिंडला तो त्याला आपली प्रजा धनधान्याने समृद्ध आहे असे आढळून आले. पण त्याला असे कळले या लोकांची परमेश्वरावर श्रद्धा नाही. ते सदाचाराने वागत नाहीत व कामक्रोधादि विकाराने पछाडल्यामुळे अत्यंत दुःखी आहेत. त्यामुळे श्रीरामाला उद्विग्नता आली व अयोध्येला परत आल्यावर वैराग्ययुक्त होऊन आपल्या मंदिरात

सर्व भोगयुक्त विषयांचा त्याग करुन विषण्ण स्थितीत तो राहू लागला. त्यामुळे दशरथ राजाला फार वाईट वाटले, व त्याने श्रीरामाची पुष्कळ समजूत घालून पाहिली पण श्रीरामावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही.

इतक्यात असे घडले की, विश्वामित्र ऋषी दशरथ राजाकडे आले व दंडकारण्यातील ऋषीमुनींचा रावणादि राक्षस आपल्या अनुयायाकरवी त्यांचे आश्रम व यज्ञादि भ्रष्ट करून त्यांचा छळ करीत आहेत असे सांगितले व त्यांचे रक्षण करण्यासाठी आपल्या बरोबर श्रीरामाला पाठविण्यास सांगितले. दशरथ राजा श्रीरामाचा वियोग करण्यास तयार नाही असे पाहून विश्वामित्रांनी श्रीरामालाच दरबारात बोलावले. श्रीराम आला पण त्याची उद्विग्न व विषण्ण अवस्था पाहून वसिष्ठ महर्षींकडून श्रीरामाला आत्मज्ञान देवविले व तू साक्षात् विष्णूचा अवतार असून धर्म व साधुजनांचे रक्षण करण्यास तूच एक समर्थ आहेस असे त्यास बजावले. श्रीरामाला ते सर्व पटले व तो विश्वामित्रांच्या बरोबर जावयास सज्ज झाला. नंतर राक्षसांचा वध करून विश्वामित्रांच्या यज्ञाचे रक्षण केले. पुढे अहिल्येचा उद्धार करून, शिवधनुष्याचा भंग केला व सीतेशी विवाह झाला.

त्यानंतर दशरथाने श्रीरामाला यौवराज्याभिषेक करण्याचे ठरविले पण कैकयीच्या द्वेष मत्सरामुळे त्याला चवदा वर्षे वनवास पत्करावा लागला. त्याला राज्याचा मोह बिलकूल नव्हता. म्हणून तो आनंदाने वनवासाला निघाला. आपल्याबरोबर कुणाला त्याने बोलावले नाही. पण सीता व लक्ष्मण आपणहून त्याच्या बरोबर गेले. वनवासात असताना किष्किंधा नगरीतील वानरांचा राजा सुग्रीव याच्याशी सख्य करून सुग्रीवाचा भाऊ वाली याने त्याचे राज्य व पत्नी बळजबरीने घेतली होती त्या वालीचा वध केला. सुग्रीवाने किष्किंधा नगराचे राज्य श्रीरामाला देऊ केले. पण आम्ही वनवासी आहोत, आम्हाला तुझे राज्य घेण्याचा अधिकार नाही. असे सांगून तो मोहात पडला नाही. पुढे रावणाने सीतेचे हरण केले. तेव्हा वानरांचे सहाय्य घेऊन लंकेवर स्वारी करून रावणादि राक्षसांचा वध केला व सीतेला बंधमुक्त केले. परंतु सीता रावणाकडे राहिल्याने भ्रष्ट झाली आहे हा लोकापवाद टाळण्यासाठी तिला अग्निदिव्य करायला लावून मगच तिचा स्वीकार केला व आपण सीतेच्याही मोहात नाही हे जगाला दाखवून दिले. रावणाचा बंधू बिभीषण हा श्रीरामाचा भक्त होता. त्याने लंकेचे राज्य श्रीरामाला अर्पण केले. त्याचा स्वीकार न करता बिभीषणाला राज्यावर बसविले.

अयोध्येला परत आल्यावरही भ्रष्ट झालेल्या सीतेचा, आपला राजा धर्मशील व आदर्श राजा श्रीराम याने स्वीकार केला याबद्दल प्रजेच्या मनात किंतु आहे, हे

श्रीरामाला समजले. तेव्हा ती गरोदर आहे हे जाणूनही लक्ष्मणाकरवी तिला एकटी-लाच वनवासात सोडले. तिथे वाल्मिकी ऋषींनी तिचे आपल्या आश्रमात रक्षण केले. शेवटी सीता पृथ्वीत गडप झाली व तिने आपल्या जीवनाचा शेवट केला. तरीही श्रीरामाला दुःख झाले नाही. गांभीर्याने व वैराग्ययुक्त निर्मोहाने त्याने पुष्कळ वर्षे पुढे राज्य केले व प्रजेला सुखी केले. शेवटी आपल्या देहाचाही मोह सोडून तो शरयू नदीत विलीन केला. अशा रितीने प्रभु श्रीरामचंद्राने आपली दिव्य अद्भुत अशी निर्मोहावस्था प्रगट करून जगाला कायमचा आदर्श घालून दिला आहे.

# अबब ! संस्थानला केवळ उदी साठी

## वार्षिक तीस हजार रुपये खर्च

शिरडीला जाऊन आलेल्या साई भक्ताने त्यांच्या प्रसादासोबत जर उदी दिली नाही तर तो प्रसाद अपूर्ण समजला जातो. खरा प्रसाद हा उदीचाच वेळ प्रसंगी, अडी अडचणीच्या वेळी या उदी प्रसादाचा आजवर आश्चर्यकारक उपयोग होत आला आहे इतके या उदीचे महत्त्व आहे.

पण या उदीपायी संस्थानला अफाट खर्च येतो. द्वारकामाईतील धुनीमार्फत ही उदी मिळते खरी पण या धुनीत टाकण्यासाठी वर्षाकाठी ८०० मण लाकडे लागतात. एक मण लाकडाचा भाव शिर्डीस ८ रु. आहे. याचे वर्षाकाठी रु.६४०० होतात. लाकडाबरोबर गोवऱ्या पण धुनीत टाकल्या जातात. वर्षाकाठी २५०० पोती गोवऱ्या लागतात. एका पोत्याला सध्या ३ रु. पडतात. तेव्हा लाकडे व गोवऱ्या यांची किंमत १३९०० रु. होते. ही लाकडे व गोवऱ्या वाहुन आणण्या-साठी वेगळी मजुरी द्यावी लागते. धुनीतून काढलेली उदी चाळण्यासाठी दोन रु. मजुरीवर काम दिले जाते. भक्तांना ही उदी नीट प्लॅस्टिकच्या डबीत घालून अथवा पोस्टाने पाठविली जाते. या सर्वांपायी वर्षाकाठी आणखी १५ हजार रु. खर्च येतो. अशा प्रकारे केवळ उदीसाठी साईबाबा संस्थानला वर्षाकाठी सुमारे तीस हजार रु. खर्च येतो पण संस्थान हा सारा खर्च मोठ्या आनंदाने करते व साई भक्तांना उदीपासून समाधान मिळावे म्हणून सतत प्रयत्नशील राहाते.

— सदानंद

# श्रीसाईबाबा उदी महात्म्य

डॉ. के. भ. गव्हाणकर,
कुर्ला–७०



'उदी' (अंगारा–राख) ही धुनीमाईपासून प्रसवली व प्रसवत आहे व अखंड प्रसवत राहील. श्रीसाईबाबांच्या कारकीर्दीत व त्यांच्या पश्चात् ती गोणीच्या गोणी लोकांस –भक्तांस पुरविली गेली व पुरविली जात आहे. ही धुनी स्वतः श्रीसाईबाबांनी शिरडीच्या मोडक्या-तोडक्या जीर्णावस्थेत आलेल्या मशिदीत–जिला साईबाबांनी द्वारकामाई म्हणून संबोधिले–प्रज्वलित केली व त्या वेळेपासून ती सतत पेटत आहे–धुमसत आहे.

शिरडी वृन्दावनातील द्वारकामाई (मशीद) त्या वेळी अगदी जीर्ण व पडक्या स्थितीत होती. बाबा दिवसा इकडेतिकडे जात, पण रात्री द्वारकामाईतच राहात. कोणी नेले तर जात, लोकांस औषधपाणी सांगत व देत. पण त्यासाठी कोणाकडून कधीही पैसे घेत नसत. इतकेच नव्हे तर रोग्यांची सुश्रुषा योग्य प्रकारे होत नसली तर जाऊन आपण स्वतः करीत पुढे पुढे त्यांनी औषधपाणी देण्याचे बंद केले व नुसती उदी देऊ लागले. एकदा बाबा काकासाहेब दीक्षितांना म्हणाले "काका, पूर्वी मी लोकांना औषध देत असे. पुढे औषध देणे सोडले आणि हरी हरी करू लागलो आणि हरी हरी करता-करता हरी भेटला.

बाबा स्वतः धुनीमाईकरता दूर दूर जाऊन जंगलातून मोठमोठी लाकडे आणीत व झालेली राख उदी–अंगारा म्हणून सर्वांस देत व कपाळास दोन भुवयांच्या मधोमध (१७ वी कला) जोराने लावीत.

ही उदी आपणास काय सांगते व काय शिकवते ?

देहही पंचमहाभूतांचे काष्ठ । भोग भोगावया अवशिष्ट । भोग सरता पडेल निश्चेष्ट । होईल विस्पष्ट ही राख ॥

बा मानवा ! देहाची अशीच राख होणार आहे तरी सावध रहा. माया, महामाया, आदिमाया यांच्या काटेरी कुंपणाने हे विश्व चोहोबाजूनी वेष्टिले आहे. ब्रह्म सत्य, ब्रह्मांड अनृत ह्याची जाणीव ही उदी देत आहे.

ह्या मायारुपी जगात कोणी कोणाचे नाही. भाऊबंद, आसइष्ट सर्व पैशाचे आहेत. निर्वाणीचा सखा मात्र श्रीसाई ( पांडुरंग ). आपण नग्न आलो नग्न जाणार.

जो जन्मला तो मेला. बारसे आनंदाने, थाटाने पेढे-बर्फी वाटून करतात-आणि मेल्यावर धाय धाय रडतात. मृत्यु या शब्दाच्या ठिकाणी जी वियोगाची कल्पना आहे तीच आमच्या दुःखास कारणीभूत होते. परंतु एखाद्या मित्राचे आपण ज्या-प्रमाणे स्वागत करतो त्याप्रमाणेच मृत्युचे स्वागत करण्याची आपल्या मनाची तयारी झाल्यावर त्यापासून जीवास दुःख किंवा त्रास होण्याची मुळीच भीती नाही.

जीवन व मरण ही दोन्ही मंगल आहेत. मृत्यु हे सुद्धा ईश्वराचेच एक स्वरूप आहे. मृत्यु म्हणजे जीवनवृक्षाला लागलेले गोड फळ.

मरण हें पेरणे जन्म हे उगवणे।
हे मायेचि खूण नाणीतली ।।
संग तुझा पुरे संग तुझा पुरे।
संग तुझा पुरे नारायणा ।।
तू तरी न मरे मी तरी न मरे।
भक्ति हे संचरे ह्याचि लाभू ।।
विठा म्हणे केशवाठाईच मीनणे।
गर्भवास भोगणे तुझी लाज ।।

देह म्हणजे एक मडकेच आहे. त्या जगन्नायकाने ही देहरूपी मडकी बनविली काही लहान काही मोठी काही कच्ची, काही पक्की, काही फुटलेली, काही नवीन, आणि ती बनवून अखिल सृष्टीच्या बागवानाकडे या पृथ्वीवर नंदनवन करण्याकरिता धाडून दिली.

मृत्यु म्हणजे महायात्रा, महानिद्रा, महाप्रस्थान, आपण दररोज अगदी गाढ झोपतो. झोप म्हणजे काय ? तर लघु मरणच. सून माहेरी जाऊन सासरी येते तसेच.

मृत्यु दारात येताच त्याला तू काय अर्पण करणार ? त्याला मी रित्या हाताने जाऊ देणार नाही. माझा प्राण त्याच्या स्वाधीन करीन. माझ्या जीवनपात्रामध्ये निरनिराळ्या ऋतूत जे रस निर्माण झाले ते रस, हृदयातील सुखदुःखे व आजपर्यंत केलेला धनसंचय –पुण्य–मृत्युला अर्पण करीन.

अशा प्रकारची तयारी आपण ठेवली पाहिजे. म्हणजे मृत्यूचे आपणास भय वाटणार नाही. आपण सर्व ' अहं 'च्या ' मी '-पणाच्या स्वाधीन झालो तरी पण मी निर्बल मी दीन, मी मर्त्य असे प्रांजलपणे कबूल करतो.

म्हणून प्रत्येक भक्ताने नुसती उदी लावून चालणार नाही. त्या उदीच्या पोटी

भरलेला महत्वाचा उपदेश, आदेश, आज्ञा ध्यानात घेऊन, अहंपणाचा 'मी' झुगारून देऊन उपजत 'मी' ला प्रगट करा.

अनेक जन्मींच्या पुण्यसंचयामुळे नरदेहाची प्राप्ति होते. देह हेच देवालय असून त्यातील जीवात्मा हाच श्रीसाई आहे. आपण जसे देऊळ स्वच्छ, शुद्ध आनंददायक असे ठेवतो तसेच देऊळ प्रत्येक मानवाने आपल्या आचरणाने उत्तम प्रकारे जो पासून ते शुद्ध, स्वच्छ व निर्मळ स्थितीत राहील असे केले पाहिजे.

ज्याप्रमाणे सुंदर मूर्तीची संभ्रमाने स्थापना करावी आणि पुढे देवालयाची दुर्दशा होऊन ती मूर्ती जागच्या जागी पूजेशिवाय पडून रहावी, तद्वत् आमच्या जन्मवेळी केलेला आनंदोत्सव या देहाचा दुरुपयोग केल्यास पुढे चालू रहाणे शक्य नाही. म्हणून देहरूपी देवालय सुदृढ स्थितीत राहून ते वंदनीय व निर्मळ ठेवणे हेच योग्य.

कै. सगुण मेरू नाईक यांना बाबांनी रोज सकाळची न्याहरी आणीत जावी अशी स्वप्नात आज्ञा केली. नंतर जागृतावस्थेत न्याहरीत काय पदार्थ असावेत हे समक्ष सांगितले. नंतर काही काळानी न्याहरी देण्यापूर्वी प्रथम तूप घालून दोन घास या धुनीत टाकावे असे सांगून स्वतः प्रत्यक्ष कृती करून दाखविली. तूपाखेरीज भात आणू नये अशी आज्ञा केली. म्हणजे रोज वैश्वदेव करून नंतर परमात्मा साईबाबास नैवेद्य देत जावा अशी धार्मिक शिकवणूक दिली. अग्नी हे देवांचे मुख आहे. ज्या धुनीत श्रीबाबांनी अन्नाचे हवन केले त्या धुनीचे महत्त्व काय वर्णावे ?

बाबाजी पाटील नेवासकर हे बाबांचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांच्या श्राद्धाच्या वेळी अदमासापेक्षा तिप्पट लोक जेवायला आले. पाटलांची बायको घाबरली व तिने आपल्या सासुबाईस आपली अडचण सांगितली. त्या बाईने यत्किंचितही न घाबरता मूठभर उदी घेऊन अन्नाच्या सर्व भांड्यात घातली व भांड्यावर एक कपडा झाकून ठेवला मग तिने सूनेला सांगितले, 'या भांड्यातून खुशाल वाढायला घेऊन जा. मात्र धोतर झाकलेलेच राहू दे. श्रीसाईबाबा आपली लाज राखतील. काही काळजी करू नको.'

सूनेने सासुबाईच्या सांगण्याप्रमाणे केले व बाबांनी त्यांची खरोखरच लाज राखली. सगळ्यांची जेवणे व्यवस्थित तर झालीच पण कितीतरी अन्न शिल्लक उरले.

नाशिकास नारायण मोतीराम जानी या नावाचे औदिच्य ब्राह्मण राहात असत. बाबा देहधारी असताना ते दोनदा येऊन दर्शन घेऊन गेले होते, पण बाबांच्या समाधीनंतर समाधीच्या दर्शनाला येण्याचा त्याना तीन वर्षात योग आला नव्हता. अर्थात् त्यांनी तेवढ्या अवधीत समाधी पाहिलेली नव्हती. समाधीनंतर सुमारे एका वर्षाने ते फार आजारी पडले. आजारात काही दिवस गेल्यावर नारायण अतिशय त्रस्त झाले तेव्हा बाबांनी त्यांना स्वप्नात दर्शन दिले,—

बाबा एका भुयारातून बाहेर निघून नारायणरावाजवळ आले नि म्हणाले. 'काळजी करू नको. उद्यापासून तुला उतार पडेल व आठ दिवसात तू चांगलाच बरा होशील. ही घे उदी, ती तू आपल्याजवळ ठेव म्हणजे " मी संगं हाय, घाबरावं कशाला."

आणि खरोखरच तसे घडून आले. दुसऱ्या दिवसापासून त्यांची प्रकृती सुधारू लागली व आठ दिवसातच ते बरे झाले.

शिरडीतील धुनीमाईमध्ये बाबांनी आत्म-परमात्व तत्त्व ओतून गोर गरीब, दुःखीकष्टी, सर्व जीवनाकरिता अखंड प्रज्वलीत करून ठेवलेला महान् उदी म्हणजे साईबाबांची प्रत्यक्ष भेट व आशीर्वाद.

मनुष्यदेहीं ब्रह्मप्राप्ती । ते देहभाव नसावा चित्तीं ।
विदेहत्वें परमार्थगती । विवेक मद्युक्ति निज पुरुषार्थं ॥
वरदेहा ऐसें गोमटे । शोधितां त्रैलोक्यीं न भेटे ।
आणि देहा ऐसे वोखटें । अत्यंत खोटे आन नाहीं ॥
वोखटें म्हणून न त्यागावे । तरी मोक्षसुखा नागवावें ।
गोमटे म्हणून भोगावे । ते अवश्य जावे अधःपाता ॥
हे भोगावे न त्यागावे । निज पुरुषार्थी लागावे ।
भगवन्मार्गीं लावावें । तरीच सुखा ॥

ही जीवनमुक्त स्थिती संपादणे हेच जीवितसाफल्य आहे, आणि ही अवस्था देहाला प्राप्त झाल्यावर विश्वचैतन्यामध्ये आत्मचैतन्याची ज्योत मिळून जावी म्हणजे सर्व भेदभाव नष्ट होतो.

मरण माझे मरोन गेले ।
मज केले अमर ॥
ठाव पुसिले बुड पुसिलें ।
वोस वोसले भेदभाव ॥
आला होता गेला पूर
धरिला धीर जीवनी ॥
तुका म्हणे बुनादीचे ।
जाले साचे उजवणे ॥

सत् + चीत + आनंद श्रीसाईबाबा म्हणजेच आजची शिरडीतील धुनीमाईतील उदी.

उदी ! उदी !! उदी !!!

卐

## तंदुल अवघ्राणाने पीडा जाणणारे सुविद्य मंत्रश्रेष्ठ

# श्री. सदाशिव दिगंबर उर्फ दाजीसाहेब जोशी

* सदानंद चेंदवणकर
" राधा-माधव," १२०।४०५५ टिळक नगर,
मु. पो. चेंबुर, मुंबई ४०००८९



मुंबापुरीतल्या परळ विभागात एक अध्यात्मवादी मंत्रश्रेष्ठ ख्यातविख्यात आहेत. ते सुविद्य असल्याने अनेक सुबुद्ध मंडळी त्यांच्याकडे आपापल्या अडीअडचणी निवारण करण्यासाठी कूटप्रश्न--पिडा परिहारासाठी सारख्या जात येत असतात. सुबुद्धांना सुखद अनुभव येतो म्हणूनच की काय सर्वसामान्य लोकही त्यांच्याकडे वेळप्रसंगी धावतात आणि आपला फायदा साधून घेतात. सर्वांनाच सारखेच आकर्षून घेणाऱ्या व त्यांच्या अडीअडचणी निवारण करण्यासाठी त्यांना विनामूल्य मार्गदर्शन करणाऱ्या या सेवाभावी व ईश्वरभक्त व्यक्तीचे नाव आहे श्री. सदाशिव दिगंबर जोशी. दाजीसाहेब या नावाने ते आपल्या असंख्य मित्रपरिवारात परिचित आहेत. गेली २५ वर्षे जोशीसाहेब हा व्याप सांभाळून आहेत. डॉक्टरांकडे जाऊन गुण नाही पण त्यांच्याकडे येऊन अनेक व्याधीग्रस्तांना गुण आलेला आहे. अडीअडचणीत सापडलेल्यांना दिलासा मिळालेला आहे, गरजू कुमारिकांना सौभाग्य प्राप्त झालेले आहे.

श्री. दाजीसाहेब हे मूळचे ठाणे जिल्ह्यातल्या वाडे तालुक्यातल्या पालघर जवळच्या गोऱ्हे या गावचे. त्यांचा जन्म ५ एप्रिल १९२९ रोजीचा. त्यांचे वडील आपल्या गावी शेती करून भिक्षुकी करीत. १९७१ साली ते निवर्तले. त्यांच्या मातोश्री उमाबाई या मात्र अजूनही हयात आहेत.

दाजींचे मराठी सातवी पर्यंतचे शिक्षण गोऱ्हे गावातच झाले. तिथे ५९ टक्के गुण मिळवून ते व्हः. फायनल झाले व इंग्रजी शिक्षणासाठी वसईला आपले काका

श्री. शंकरराव यांचेकडे आले. वसईच्या न्यू इंग्लीश स्कूलचे ते विद्यार्थी. तिथे वर्षात तीन इयत्ता करून ते पुढील शिक्षणासाठी पनवेलच्या विठोब्बा खंडोप्पा हायस्कूलात आले व १९४८ साली मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे मुंबईच्या सिद्धार्थ कॉलेजात त्यांनी नाव दाखल केले व बी. ए. आणि एल. एल.बीचा अभ्यास करून ते यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. शाळा कॉलेजात असताना संस्कृत व इंग्रजी हे त्यांचे भारी आवडीचे विषय.

वकीलीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी सचिवालयात सिव्हिल सप्लाय खात्यात नोकरी पकडली. तिथे ते तीन वर्षे होते. १९५४ साली ते रेल्वेत नोकरीस राहिले व सध्या ते रेल्वेच्याच क्लेम्स डिपार्टमेंट कोर्ट सेक्शनमध्ये अधिकारपदावर आहेत.

जोशीसाहेबांना ज्योतिष व हस्तसामुद्रिकाचा लहानपणापासूनच छंद. वयाच्या नवव्या वर्षी त्यांची विख्यात ज्योतिषी पं. पद्मनाभशास्त्री पालये यांचे वडील कै. पांडुरंगशास्त्री पालये यांचेशी गाठ पडली. त्यावेळी त्यांच्या दशमात मंगळ होता आणि याच सुमारास योगायोगाने एका अनामिक पुजारी गुरुजींनी त्यांना कपाळाचे ज्ञान, भ्रुकुटी ज्ञान, रेषा इ. चे ज्ञान त्यांना दिले, एक सांकेतिक लिपीही त्यांनी त्यांना शिकवली. या मिळकतीवर त्यांनी अधिकाधिक ज्ञान मिळवले व आपल्या इष्टमित्रांकडून ते अनुभव मिळवू लागले. पुढे नोकरीस लागल्यावर त्यांचे वरीष्ठ त्यांचेकडे आपल्या मित्रमंडळींना पाठवू लागले आणि अशा प्रकारे तेव्हापासून तो आजतागायत त्यांच्याकडे येणाऱ्या मित्रांचा, आगंतुकाचा ओघ चालूच आहे.

विश्वविद्यालयीन शिक्षण चालू असतानाच जोशीबुवांनी 'फ्रेनॉलॉजी' (भालप्रदेशाचे ज्ञान)चा शास्त्रीय अभ्यास केला. कपाळावरील रेषा, खड्डे, नासिका, नेत्र, भ्रुकुटी यावर आधारभूत आकडेशास्त्राचे सूक्ष्म अध्ययन केले. न्यूमिरॉलॉजी, हस्तसामुद्रिक, छायाशास्त्र, वैद्यकीय ज्योतिष (मेडिको ॲस्ट्रॉलॉजी) या विषयावरचे प्रगत ज्योतिषशास्त्राचे मिळाले तेवढे ग्रंथ वाचले व त्यातून टीका टिप्पणी काढल्या. या त्यांच्या सूक्ष्म अभ्यासाचा त्यांना आज अतिशय उपयोग होत आहे. या सर्व व्यासंगी अभ्यासाचा परिणाम म्हणूनच की काय १९५५ साली त्यांना प. पू. काणे महाराजांनी अनुग्रह देऊन स्थानबद्ध केले आणि पंचम पाक्षिक ज्योतिषशास्त्राची प्रत प्रसाद म्हणून भेटीदाखल दिली. गुळवणी महाराजांनी त्यांना शक्तिपात योगाची दीक्षा दिली.

भारत–चीन युद्धाचे वारे वहात असतानाची गोष्ट. एका मध्यरात्री त्यांच्या

दारावर थाप पडली. दार उघडल्यावर एका अज्ञात व्यक्तीने त्यांना पावसच्या श्रीस्वरुपानंद महाराजांच्या भेटीचे निमंत्रण दिले. जोशीबुवा लगोलग पावसला गेले. तेव्हा रात्र झाली होती. महाराजांना रात्री भेटता येत नसे. पण काय आश्चर्य ! स्वरु-पानंदांनी त्यांना भेटीस बोलावून त्यांना 'सोहम्'ची दीक्षा दिली. संत पाचलेगावकर महाराज व डोंगरीचे तात्या महाराज यांनीही त्यांना त्यानंतर अनुग्रह आशिष दिले. जोशीबुवा गोंदवलेकर महाराजांचीही उपासना करतात.

श्री. दाजीसाहेब जोशी श्रीदेवीचे कडक उपासक आहेत. गोन्हेगावची देवी अंबिका त्यांना सुप्रसन्न आहे अशी ख्याती आहे. देवीप्रमाणेच भगवान दत्तात्रेयाची, साईबाबांची व श्री गणेशाची ते आराधना—उपासना करतात. मनात आले रे आले की ते चटकन् शिर्डीला जाऊन येतात व बाबांच्या चरणावर मस्तक ठेवून येतात.

जोशीबुवा न चुकता दर मंगळवारी सायंकाळी सार्वजनिकरित्या देवीच्या उपासना आराधनेला बसतात. त्यावेळी अडचणीत सापडलेले व दुःख शितल करण्यासाठी, मार्ग शोधण्यासाठी असंख्य लोक त्यांचेकडे येतात. त्यामध्ये अविवाहीत कन्याकुमारींचा जास्त भरणा असतो. इच्छित वरप्राप्तीसाठी निश्चित उपाययोजना बुवा त्यांना सांगतात त्याचप्रमाणे असाध्य रोगावर हमखास उपाय, हरवलेल्या व्यक्तीचा, वस्तूचा, नेमका शोध, पत्रिकेवरून कोणत्याही रोगाचे निदान जोशीबुवा करतात. इतकेच नव्हे तर बालक मातेच्या उदरात असताना त्याची पत्रिका ते तयार करून देतात. गेली सात आठ वर्षे ते वावेघरच्या श्री. पांडुरंग कृष्णा ठाकरे यांचे-कडे पावसाच्या निश्चित तारखा अगोदर देऊन ठेवतात. या तारखा पंचांगात दिलेल्या नसतात. या तारखांमुळे शेतकऱ्यांना खूपच फायदा झालेला आहे. अनेक बाधा-पिडा झालेल्या लोकांनाही ते मुक्त करतात.

दर मंगळवारी सायंकाळी श्रीदेवीसमोर शुचिर्भूत होऊन आसनस्थ झाल्यावर आलेल्या गरजू व्यक्तिच्या उजव्या हातात जोशी बुवा प्रथम तांदूळ देतात. काही वेळा-नंतर ते तांदूळ समोरच्या तबकात ठेवण्यास सांगतात. त्या ठेवलेल्या तांदळाचे ते चार समान भाग करतात व त्यापैकी एक कोणताही वाटा सदर व्यक्तीने उचलून जोशी बुवांच्या हातात द्यायचा असतो. त्या तंडुल भागाचा ते वास घेतात व लगेच त्यांच्यात काहीसे संचारल्या सारखे होते. एक प्रकारच्या दैवीक शक्तिने त्यांना पीडेचा दुःखाचा बोध होतो, झालेल्या बाधेचे ज्ञान होते व दुःख-बाधा नष्ट करण्यासाठी काय करायचे हे ते कथन करतात नव्हे ते खाली लेखी लिहून सही पण करून देतात. त्यांच्या सांगण्याप्रमाणे उपाय योजना केल्यावर अनेकांना फायदा झालेला आहे. यांच्याकडे येऊन जाणाऱ्या असंख्य मंडळीत कितीतरी थोरमोठे लोक आहेत. त्यामध्ये

श्री. चिन्मुळगुंद साहेब, श्री. जगजितसिंग, नगरचे न्यायमूर्ती, श्री. सुळे, ठाण्याचे श्री. पटेल जज, डॉ. कांगो, डॉ. खानापूरकर, डॉ. पेंढारकर, डॉ. भानोत्रा, प्रा. फ्रँक डिसोजा, प्रा. कुक्स, प्रा. जवळगेकर, प्रि. दामले, कै. प्रि. सी. बी. जोशी, एस. एस. सी. बोर्डाचे श्री. सी. डी. देशपांडे, जमाखिंडीचे पटवर्धन, श्रीमंत अक्कासाहेब बावडेकर इ. बड्यांचा समावेश आहे व त्यात सारखी नव्यांची भर पडत आहे.

श्री. दाजीसाहेब जोशी याना अनेक मंत्रांची चांगली माहिती आहे. ग्रह-योगाला साधक असे जप व औषधे यांचे भरपूर ज्ञान त्यांना आहे. तसेच पक्षघात व कोड यावर रामबाण उपाय ते सुचवतात.

श्री. दाजीसाहेब यांचा विवाह १९५४ साली झाला. त्यांच्या पत्नी सौ. सुगंधा या पुण्याजवळच्या पौडच्या. जोशी दांपत्याला प्रदीप, प्रवीण व प्रफुल्ल असे तीन पुत्र असून त्या तिघांचेही जन्म बुधवारचेच आहेत ही विलक्षण योगायोगाची गोष्ट आहे. श्रीदेवीची, श्रीसाईबाबांची मनःपूर्वक उपासना करून आपण मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग करून ते सर्वसामान्य जनतेची दुःखे दूर करण्यासाठी अक्षरशः विनामूल्य झटतात याबद्दल आम्हाला त्यांचे मनःपूर्वक कौतुक करावेसे वाटते. त्यांना अशाच प्रकारचे उज्ज्वल यश लाभो ही प्रार्थना.

## नांदा सौख्यभरे

श्रीसाईलीला तृतीय लेखक-कवींचे संमेलन प्रसंगीचे अध्यक्ष, व स्वत: श्रीबाबांचे अनेकवार दर्शन घेतलेले अहमदनगरचे साईप्रेमी भक्त श्री. अनंत जयदेव चितांबर यांची कन्या शैलजा बीएससी (ऑ.) हिचा शुभविवाह नाशिकचे श्री. विजय विश्वेश्वर कुलकर्णी यांचे बरोबर अहमदनगर येथील श्रीरामशामी गणेश मंदिर मंगल कार्यालयात १ मार्च ७८ रोजी थाटाने साजरा करण्यात आला. वधूवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी शहरातील अनेक मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने हजर होती.

# — बाबांची उदी —

सव धन्य क्षेत्र हे
धन्य द्वारकामाई !
ह्या इथे अखंडीत
धुनी पेटती राही ! ॥ १ ॥

ह्या धुनीत जळती
त्रिविध ताप, कूत कर्म
अती पवित्र पावन
उदी शिर्डीचे मर्म ॥ २ ॥

ही उदी नव्हे हो
कलीयुगीचे अमृत
मी धारण करीते
उदी, भस्म भाळास ॥ ३ ॥

सेवता उदी मी
रोग मुक्त आज झाले.
श्रीसाईनाथे !
उदीस आषीश दिधले ॥ ४ ॥

भक्तीने लावीता !
उदी नित्य भाळीस
मग प्रसंग येता !
साई सांभाळीत ॥ ५ ॥

हा नव्हे कुणास्तत्र
उपदेशाचा डोस
घ्या स्वये सानुभव
लाऊनी उदी भाळास ॥ ६ ॥

**सौ. लिला वनगे**
हेलीमा मंझील, गुप्ते रोड
विष्णुनगर, डोंबिवली (पश्चिम)

# ऊदी ही बस एक सहारा

ऊदी ही बस एक सहारा, संकट मोचन नाम तिहारा
जब जब हम पर विपदा आई, ऊदी दे गई साथ हमारा

(१) सांई सांई रट जी लगाया,
(२) चरण पकड़ कर शीश झुकाया,
(३) संकट के तूफान में फंस कर
(४) ऊदी को पतवार बनाया

बस हम को मिल गया किनारा
ऊदी ही बस एक सहारा ॥

कर्म की गती ने चाल चलाई, आपधि कोई काम न आई
नेक डाक्टर और हकीमों ने मिल कर सब दिया दुहाई
लिपट लिपट कर वर घर रोया लेकिन किस का बस चल पाय
बाबा को जा गई दया तो ऊदी से धीरज बंधवाया

दूर हो गया रोग हमारा
ऊदी ही बस एक सहारा ॥

बाबा बाबा रट जो लगाई लाभ हुआ जब ऊदी खाई
चली गई विपदा जो आई, दूर हुई पीड़ा जा पाई
जब जब भक्त पड़ा संकट में, शिर्डी से ऊदी ही आई
ध्यान करी उस बाबा का जिसने यह ऊदी पहुंचाई

अमर है सांई नाम तुम्हारा
ऊदी ही बस सहारा ॥

—श्री. कालिन्दीप्रसाद श्रीवास्तव
५ पुष्पाविहार, बि. नं. २.
१५९ कुलाबा मार्ग, मुं. ५

# : धुनी :

धुनी पाहता साई दिसले ।
    साई दिसले ! मुक्त हासले । ध्रु०
धुनी पेटली
    स्मृती जागती
साईशंकर बोल उमटले । १
धूर न येथे
    उजेड येथे
देहभाव तर जळले जळले । २
देह नव्हे मी !
    तो मी ! तो मी !
तत्त्व खोल हे ठसले, ठसले । ३
अग्निहोत्र हे
    अखंड राहे
या सातरथी साई वसले । ४
उदी निर्मिते
    जगी विसरते
धुनी स्वरूपी ब्रह्म भेटले ! ५
ऊब येथली
    सुखद वाटली
साई ! साई ! साधक बोले ! ६
धुनी पाहता
    सरल्या चिंता
श्रीरामाचे ध्यान लागले ! ७

— श्रीराम बाळकृष्ण आठवले
एम्. ए. बी. टी.
'बलवंत सदन'
३४४ नवी पेठ, पुणे–३०

# श्री साईलीला लेखक-कवी चतुर्थ स्नेहसंमेलन

## ( १९७८ )



डावीकडून उजवीकडे — सौ. पाठक, श्री. का. सी. पाठक कोर्टरिसिव्हर-साहेब, डॉ. के. भ. गव्हाणकर, श्रीराधाकृष्ण स्वामीजी, अध्यक्ष श्री. गणेश चितांबर, डॉ. श्री. दि. परचुरे का. संपादक इंग्रजी आवृत्ती, श्री. सदानंद चेंदवणकर का. संपादक मराठी आवृत्ती, श्री. अनंतराव चितांबर माजी अध्यक्ष.

( छाया : **जगन्नाथ कुलकर्णी**, पुणे )

[ संमेलनाचे इतिवृत्त स्थलाभावी देता आले नाही ते पुढील अंकी ]

Regd. NO. MH/BYE/26


# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( होमिओपाथिक )

## सर्व धर्मियांकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

वेळ : रोज सकाळी १०-३० ते १२-३० सायंकाळी ४–३० ते ६–३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

**आकार : दर दिवसास २५ पैसे**

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल.

**स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय**

## साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( शामदासानी फौंडेशन )

**नवजीवन हौसिंग सोसायटी,**

ब्लॉक नं. ३, रूम १०४,

लॅमिंग्टन रोड, मुंबई ४००००८


मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१. संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.